१०४ शतकोत्तर वाटचाल

एकमेव स्वतंत्र दैनिक

# नवाकाळ

• मुंबई, शुक्रवार १९ जून, २०२६ • वर्ष-१०४, अंक-१०६, पाने-८, किंमत: ₹ ७ NAVAKAL

• R.N.I.No.1814/57 • Vol.- 104, Issue - 106 Marathi - Daily - Mumbai, 19 June, 2026 Page - 8 Price- Rs. 7/-

• संपादक- रोहित रमाकांत पांडे 24x7 : www.navakal.in Email- contact@navakal.in

नवाकाळच्या Digital बातम्या पाहण्यासाठी Scan करा!

तोच थरकाप परतणार? महाराष्ट्रात नवा भूकंप!

navakal.in

@navakal.news Navakal Digital Network @_NDN_Offical @NavakalNews

# उबाठा पुन्हा फुटली! यावेळी मात्र माफी नाही! पक्षाचा आदेश
# जिथे दिसेल तिथे बंडखोराला तुडवा! शरद पवारांचीही साथ

■ मुंबई

**फुटीर** खासदारांवर हल्ले होणार हे लक्षात येताच महाराष्ट्र सरकारने या सर्व खासदारांना वाय सुरक्षा बहाल करून त्यांच्या घराभोवतीही सुरक्षा तैनात केली. दिल्लीच्या लीला हॉटेलमधून निघून सध्या हे खासदार राजस्थानमध्ये जयपूर येथे आहेत असे सांगितले जाते. पण ते आज रात्री पवईच्या वेस्ट इन हॉटेलात रात्री पोहोचतील आणि उद्या शिंदेंच्या शिवसेना पक्ष वर्धापन दिनाला हजर

**उबाठाने आज सकाळी ११ वाजता व्हिप काढून दिल्लीत बोलावलेल्या खासदारांच्या तातडीच्या बैठकीला दहापैकी सहा खासदार गैरहजर राहिले. यामुळे हे खासदार फुटले यावर आज शिक्कामोर्तब झाले. उबाठाला फुटीचा दुसरा मोठा धक्का आहे. यावेळी मात्र उबाठाने शांत न बसण्याचा निर्णय घेतला आहे. ऑपरेशन टायगरला ऑपरेशन तुडवा याने उत्तर द्या, असे पक्षातर्फे संजय राऊत यांनी जाहीर केले. शरद पवारही या मोहिमेत मैदानात उतरणार असून, या खासदारांच्या विरोधात त्यांच्याच मतदारसंघात सभा घेणार आहेत.**



Photo: PTI

## कायदेतज्ज्ञांचा खासदारांना सल्ला गट स्थापन करून विलीन करावे

निवृत्त विधिमंडळ प्रधान सचिव अनंत कळसे म्हणाले की, सहा खासदार फुटले इतके हे सोपे नाही. त्यांची खासदारकी टिकायची असेल तर पक्ष उभा फुटायला हवा, म्हणजे खासदार, आमदार ते नगरसेवक सर्वच फुटले हे सिद्ध करावे लागेल. ही प्रक्रिया लगेच पूर्ण होऊ शकत नाही. आता संसदीय बैठकीला व्हिप लागू होतो का? हा प्रश्न सर्वोच्च न्यायालयात प्रलंबित आहे. या खासदारांना स्वतंत्र गट करावा लागेल, त्या गटाला लोकसभा अध्यक्षांची मान्यता लागेल आणि मग तो गट दुसऱ्या पक्षात विलीन होऊ शकतो. पण त्यासाठी पक्षात उभी फूट पडावी लागेल. उबाठा आता या खासदारांना अपात्र करण्याबाबतचे पत्र लोकसभा अध्यक्षांकडे देऊ शकतात, त्यावर अध्यक्षांनी निर्णय घ्यायचा » पान ८ वर

राहतील, असे सांगण्यात येते. येथेच त्यांचा शिवसेनेत पक्ष प्रवेश होणार आहे. त्यानंतर ते आपापल्या मतदारसंघात जातील तेव्हा ऑपरेशन तुडवा सुरू झाल्यास काय होईल याकडे सर्वांचे लक्ष आहे.

उबाठाच्या बैठकीला पक्षाचे लोकसभेतील गटनेते अरविंद सावंत, मुख्य प्रतोद अनिल देसाई यांच्या व्यतिरिक्त नाशिकचे खासदार राजाभाऊ वाजे हे तिघे उपस्थित होते. बैठकीनंतर संजय राऊत यांनी फुटीर खासदारांना » पान ८ वर

## मुंबईत शिवरायांच्या जिरेटोपावरच जैनांनी झेंडा लावला! संताप उसळला

■ मुंबई

**मुंबईत** ठिकठिकाणी पांढरे पट्टे ओढणाऱ्या जैन बांधवांनी आता हद्द गाठल्याने संताप उसळला आहे. मालाड पूर्व परिसरातील चौकात छत्रपती शिवाजी महाराजांच्या जिरेटोपावरच एका जैनाने पांढरा झेंडा लावला. याचा व्हिडिओ व्हायरल झाल्यानंतर वातावरण तापले. मनसे कार्यकर्त्यांनी तिकडे धाव घेऊन त्या जैनाला जाब विचारला. त्यानंतर पोलिसांच्या उपस्थितीत त्या व्यक्तीने जाहीर



माफी मागून झेंडा हटवला. परंतु शिवरायांच्या जिरेटोपावर जैन धर्माचा झेंडा लावण्यामागील उद्देश काय होता? जैन समुदायाला हे प्रकार करण्याचा आदेशच आहे का? हा सवाल निर्माण झाला आहे.

सविस्तर वाचण्यासाठी व शेअर करण्यासाठी हा क्युआर कोड स्कॅन करा

मुंबईत मागील काही दिवसांपासून घाटकोपर, लालबाग, परळ सायन, गिरगाव येथे जैन मुनींसाठी रस्त्यावर पांढरे पट्टे » पान ७ वर

## युद्धसमाप्तीच्या करारावर इराण-अमेरिकेची स्वाक्षरी

■ वॉशिंग्टन

**युद्धसमाप्तीच्या** परस्पर सामंजस्य करारावर अमेरिका आणि ईराणच्या नेत्यांनी काल स्वाक्षऱ्या केल्या. अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी काल रात्री फ्रान्सच्या ऐतिहासिक व्हर्साय पॅलेसमध्ये फ्रान्सचे राष्ट्राध्यक्ष इमॅन्युएल मॅक्रोन यांच्यासोबतच्या बैठकीनंतर करारावर स्वाक्षरी केली. तर इराणचे राष्ट्राध्यक्ष पजेश्कियन यांनी इराणमधून इलेक्ट्रॉनिक पद्धतीने करारावर स्वाक्षरी केली. भारतीय वेळेनुसार आज गुरुवारी पहाटे पाच वाजता दोन्ही नेत्यांच्या स्वाक्षरीनंतर तत्काळ प्रभावाने करार लागून झाला.

या करारामुळे आता मध्य आशियामध्ये दीर्घकालिन शांतता प्रस्थापित होण्याचा मार्ग मोकळा झाला आहे, अशी घोषणा फ्रान्सचे राष्ट्राध्यक्ष एमॅन्युएल मॅक्रॉन यांनी केली. तर दुसरीकडे इराणने सावध पवित्रा घेत » पान ७ वर

## शेअर बाजारात 'सात्त्विक' प्रवेश निवडक उद्योगांचा नवा निर्देशांक

■ मुंबई

**धर्म** किंवा धार्मिकता याच्याशी काहीही देणे-घेणे नसलेल्या आणि निव्वळ भांडवलनिर्मितीची संधी गुंतवणुकदारांना उपलब्ध करून देणाऱ्या मुंबई शेअर बाजाराने (बीएसई) व्यवसायाला सात्त्विकतेची जोड देण्याचा अजब प्रयोग सुरू केला आहे. बीएसईने



सात्त्विक-१०० हा नवा निर्देशांक सुरू केला आहे. हास्यास्पद बाब म्हणजे व्यवसायात नैतिक मुल्ये आणि सात्त्विक आचरण असलेल्या कंपन्यांनाच या निर्देशांकांमध्ये स्थान देण्यात येईल, असे सांगणाऱ्या बीएसईने सांगितले

बीएसईने 'सात्त्विक-१००'या नव्या निर्देशांकाचा शुभारंभ केला आहे. सात्त्विक तत्वांचे पालन करणाऱ्या आणि आपल्या गुंतवणुकीला संस्कृती, उच्च मूल्य आणि नैतिकतेची जोड देऊ पाहणाऱ्या गुंतवणूकदारांना » पान ७ वर

## २० जूनला मुंबईत मनसेचा मेळावा

■ मुंबई

**महाराष्ट्राच्या** राजकारणात गेल्या काही दिवसांपासून सुरू असलेल्या घडामोडींच्या पार्श्वभूमीवर मनसेचा २० जून रोजी मेळावा होणार आहे. मुंबईतील रंगशारदा हॉलमध्ये होणाऱ्या या मेळाव्यात मनसे अध्यक्ष राज ठाकरे पक्षातील प्रमुख नेते, पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांना मार्गदर्शन करणार आहेत. याबाबत मनसे नेते संदिप देशपांडे यांनी सांगितले की, 'एसआयआर'सह इतर विषयांवर राज ठाकरे कार्यकर्त्यांना मार्गदर्शन करणार आहेत. राज्यातील राजकीय उलथापालथीबाबत राज ठाकरे यांनी आतापर्यंत कोणतीही थेट प्रतिक्रिया दिलेली नाही. मात्र, या मेळाव्यात ते उबाठातील फुटीपासून बदलत्या राजकीय समीकरणांपर्यंत अनेक मुद्यांवर भूमिका मांडण्याची शक्यता आहे.

## मथुरा कृष्ण मंदिरातही देणगी घोटाळा सीबीआय चौकशी करण्याची मागणी

■ मथुरा

**अयोध्येतील** राम जन्मभूमीतील राम मंदिरात भाविकांनी दिलेल्या देणग्यांमधील कोट्यवधी रुपयांचा



अपहार झाल्याचा आरोप ताजा असतानाच आता मुथरेच्या कृष्ण जन्मभूमी मंदिरातील दानपेटीत अपहार झाल्याचा आरोप करण्यात आला आहे. कृष्ण जन्मभूमी खटल्यात याचिकाकर्ते असलेल्या दिनेश फलाहारी महाराज यांनी हा आरोप केला असून, याप्रकरणी सीबीआयमार्फत चौकशी करण्याची मागणी केली आहे. दिनेश फलाहारी महाराज हे श्री कृष्ण जन्मभूमी संघर्ष न्यासाचे अध्यक्षही आहेत. त्यांनी उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांना पत्र लिहून असा आरोप केला आहे की, श्रीकृष्ण मंदिरात भाविकांनी दिलेल्या रोख स्वरुपातील देणग्या आणि दागदागिन्यांची गेल्या अनेक वर्षांपासून लूट होत आहे.

## सुलेमान बेकरी खटल्यात न्यायालयाने ३३ वर्षांनंतर पीडिताचा जबाब नोंदवला

■ मुंबई

१९९३ **मध्ये** मुंबईत उसळलेल्या हिंदू-मुस्लीम दंगलीदरम्यान दक्षिण मुंबईतील डोंगरी येथील सुलेमान बेकरी आणि लगतच्या मदरशांवर पोलिसांनी छापा टाकून केलेल्या गोळीबारात ९ मुस्लीम ठार झाले होते. या प्रकरणाच्या खटल्यात एका पीडिताचा जबाब न्यायालयाने तब्बल ३३ वर्षांनंतर नोंदवून घेतला आहे.

ही घटना घडली तेव्हा सुलेमान बेकरीलगतच्या मदरशामध्ये शिकत असलेल्या या साक्षीदाराचे वय आता पन्नास वर्षे आहे. ९ जानेवारी १९९३ रोजी हे हत्याकांड घडले, तेव्हा मदरशामध्ये ८ ते २२ वयोगटातील सुमारे दोनशे मुले होती. दुपारचे जेवण झाल्यानंतर मदरशाचे मुख्य प्रवेशद्वार आतून कुलूप लावून बंद करण्यात आले होते. कारण बाहेर दंगलींमुळे तणावाचे वातावरण होते. काही वेळाने पोलिसांनी प्रवेशद्वारावर धडक देऊन ते बळजबरीने उघडले. त्यानंतर पोलीस आमच्या खोलीत शिरून सर्वांना लाठ्या मारू लागले. पोलिसांच्या लाठीमारात माझ्या डोक्याला गंभीर इजा झाली होती. » पान २ वर

## हवाई दलाने १८ प्रादेशिक केंद्रांवर नीट प्रश्नपत्रिका पोहोचवल्या

■ नवी दिल्ली

**देशभरात** २१ जून रोजी होणाऱ्या नीट-यूजी पुनर्परीक्षेची गोपनीयता आणि सुरक्षा अबाधित राखण्यासाठी भारतीय हवाई दलाने पुढाकार घेतला. हवाई दलाच्या विमानांनी आणि एमआय-१७ हेलिकॉप्टर्सनी सीलबंद प्रश्नपत्रिका देशभरातील १८ हून अधिक प्रादेशिक केंद्रांवर हवाई मार्गाने सुरक्षितपणे पोहोचवल्या. ही अभूतपूर्व पावले पेपरफुटीच्या घटना रोखण्यासाठी आणि परीक्षा प्रक्रियेवरील विद्यार्थ्यांचा व पालकांचा विश्वास पुन्हा प्रस्थापित करण्यासाठी उचलण्यात आली. नॅशनल टेस्टिंग एजन्सी आणि इतर संबंधित मंत्रालयांच्या समन्वयाने ही मोहीम राबवण्यात आली. या प्रक्रियेत हवाई दलासोबतच सीआरपीएफ आणि सीआयएसएफचे जवानही सुरक्षेसाठी कार्यरत आहेत.

## मतदार याद्या पडताळणी ड्युटीला विरोध विनाअनुदानित शाळांची न्यायालयात धाव

**मतदार याद्यांच्या विशेष सखोल पडताळणी मोहिमेसाठी 'बूथ लेव्हल ऑफिसर' (बीएलओ) म्हणून काम करण्याला विरोध करीत विनाअनुदानित शाळांनी उच्च न्यायालयात धाव घेतली आहे.**



■ मुंबई

**ड्युटीचा** आदेश धुडकावल्याबद्दल कारणे दाखवा नोटीस बजावली असून, त्या नोटीसला याचिकेद्वारे आव्हान देण्यात आले आहे. त्यावर याचिकेवर पुढील सुनावणी होईपर्यंत कोणतीही दंडात्मक किंवा सक्तीची कारवाई करणार नाही, अशी तोंडी हमी निवडणूक अधिकाऱ्यांतर्फे न्यायालयात देण्यात आली. त्यामुळे शाळांना तात्पुरता दिलासा मिळाला आहे.

याप्रकरणी मढाई कॉस्मोपॉलिटन एज्युकेशन ट्रस्ट (कांदिवली आणि मालाडमधील चिल्ड्रन्स » पान २ वर

## दीपकेला कानशिलात लगावणाऱ्यांना पुष्पहार

**जयपूर** - जयपुरात नीट पेपरफुटीविरोधात पुकारलेल्या आंदोलनात कॉकरोच जनता पार्टीचे संस्थापक अभिजित दीपके याला कानशिलात लगावणाऱ्या तरुणांना पुष्पहार घालून त्यांचे स्वागत केले. जयपूरच्या शहीद स्मारक परिसरात अभिजित दीपके आंदोलनात सहभागी झाला होते. त्यावेळी काही तरुणांनी त्यांच्यावर अचानक हल्ला करून कानशिलात लगावली. याप्रकरणी राजस्थान पोलिसांनी सोमवारी पाच जणांना अटक केली होती. जयपूर येथील न्यायालयाने जामिनावर सुटल्यानंतर त्यांना पुष्पहार घालून स्वागत करण्यात आले. याचा व्हिडिओ व्हायरल झाला.



संस्थापक-नाट्याचार्य कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर

संपादकीय

नवाकाळ

|| न मे भक्त प्रणश्यति ||

# भेसळखोरांचे खरे हस्तक कोण ?

एखादा सरकारी अधिकारी आपल्या कर्तव्याची अगदी निष्ठेने अंमलबजावणी करतो, त्यावेळी त्याचे किती महत्त्वपूर्ण आणि दूरगामी परिणाम घडून येतात हे तुकाराम मुंढे यांच्या भेसळविरोधी मोहिमेतून सिद्ध झाले आहे. अर्थातच मुंढे यांची मोहीम जितकी भेसळ माफियांविरुद्धची धडाकेबाज कारवाई आहे तितकीच राज्य सरकारचे धिंडवडे काढणारीही ठरते. अन्न आणि औषध प्रशासन विभाग हा अत्यंत महत्त्वपूर्ण आणि एकूण सामाजिक आरोग्याच्यादृष्टीने अतिशय संवेदनशील ठरतो. ज्या पद्धतीने मुंढे एकापाठोपाठ कारवाई करत आहेत. त्यातून अनेक प्रकारच्या जीवनावश्यक वस्तूंमधल्या भेसळीची धक्कादायक माहिती समोर येत आहे. दुग्धजन्य पदार्थांपासून ते रोजच्या जेवणाखाण्यातल्या तेलतूपापर्यंत अत्यंत बेमालूमपणे भेसळ केली जाते. ज्यातून प्रत्येक व्यक्तीच्या आरोग्यावर दूरगामी असे घातक परिणाम होतात. ज्यातून अनेक प्रकारचे आजार, रोग, व्याधी, निर्माण होण्याची शक्यता असते. भेसळ करण्याची ही प्रवृत्ती म्हणजे गेल्या अनेक वर्षांची समाजविघातक विकृतीची परंपरा आहे. तुकाराम मुंढे यांच्या या धडक कारवाईने दोन गोष्टी अतिशय ठळकपणे स्पष्ट झाल्या. एक म्हणजे यापूर्वीचे या विभागातले अधिकारी कसे बेजबाबदारपणे वागत होते. आणि कर्तव्यशून्य अशा या लोकांच्या छुप्या समर्थनातूनच भेसळखोरांनी हैदोस घातला होता. अशा प्रकारचे शासकीय किंवा राजकीय समर्थन असल्याशिवाय भेसळखोरांचा हा धुमाकूळ चालूच शकत नाही. त्या विभागातल्या अधिकाऱ्यांचा बेजबाबदारपणाच यातून ठळकपणे उघडा झाला तर दुसरीकडे राज्य सरकार ज्या पारदर्शक कारभाराचा ढोल बडवत असते. ती पारदर्शकताही किती बेगडी स्वरूपातली आहे हेसुद्धा मुंढे यांच्या या कारवाईतून आपोआप स्पष्ट झालेले आहे. ही केवळ भेसळखोरांविरुद्धची कारवाई नाही तर राज्य सरकारमधल्या भेसळखोरांच्या हस्तकांवरचा तो हल्लाबोल ठरतो. राज्य सरकारच्या तथाकथित पारदर्शकतेचा बुरखाही त्यानिमित्ताने फाडला जातो आहे. आज मुंढे यांना कारवाईची मोकळीक देऊन सरकार त्यांच्या पाठीशी आहे असा जरी दावा सरकारने केला. यापूर्वी अशाच धडक कारवाया का होऊ शकल्या नाहीत याचे सरकारकडे कोणतेही उत्तर नाही. ही वस्तुस्थिती आहे.

**लोकांच्या जीवाशी खेळ**

भेसळीचे गैरप्रकार हे जेव्हा इतक्या मोठ्या प्रमाणावर होतात त्यावेळेला ती भेसळ करणाऱ्यांचे धाडस निश्चितपणे वाढलेले असते. कारण त्यांना आपल्यावर कोणतीही कारवाई होणार नाही याची खात्री असते. शिवाय कारवाई झाली तरी आपण त्यातून सहिसलामत बाहेर पडू याच्याबद्दलही प्रचंड आत्मविश्वास असतो. म्हणूनच तुकाराम मुंढे यांनी स्वतः पुढाकार घेऊन जी मोहीम सुरू केली आहे ती सर्वसामान्य माणसाला दिलासा देणारी ठरते. त्यांच्या प्रत्येक कृतीला स्वाभाविकपणे सामान्य माणसाचे समर्थनही मिळते. परंतु इथेसुद्धा पुन्हा तोच प्रश्न उपस्थित होतो. मुंढे यांनी या खात्याचा कारभार स्वीकारण्यापूर्वी अन्न, औषध प्रशासन विभागातले अधिकाधिक कर्मचारी इतके सुस्त आणि मस्त कसे काय होते. अशाच प्रकारच्या धडक कारवाया या विभागातल्या अधिकाऱ्यांकडून अपेक्षित असतात. परंतु त्या अधिकाऱ्यांनी इतक्या धडकपणे कोणतीही कारवाई केली नाही. याचीदेखील दोन कारणे असू शकतात. एक म्हणजे अधिकाऱ्याने कारवाई जरी केली तरी स्थानिक स्तरावरचे राजकीय कार्यकर्ते, नेते या अधिकाऱ्यांवर दबाव टाकत असतात. कारण इतक्या बिनधास्तपणे भेसळ करण्याची मुभा जेव्हा मिळते. तेव्हा अशा भेसळखोरांमध्ये अनेक लोक राजकारण्यांचे बगलबच्चे असतात. त्यांना सर्व प्रकारचे संरक्षण मिळत असते. आणि दुसरे कारण म्हणजे या अधिकाऱ्यांचेसुद्धा भेसळखोरांबरोबर साटेलोटे असते. म्हणूनच डोळ्यादेखत भेसळीचे प्रकार करत असताना त्याकडे निर्लज्जपणे डोळेझाक करण्याचा प्रकार घडतो. तुकाराम मुंढे यांना आमचे आवाहन आहे की, त्यांनी जशी वेगवेगळ्या वस्तू किंवा खाद्यपदार्थांमधली, औषधांमधली भेसळ शोधण्याचे काम सुरू केले आहे. तशीच मोहीम त्यांनी त्यांच्या स्वतःच्याच अन्न, औषध प्रशासन विभागात सुरू करायला हवी. कारण या भेसळखोरांकडे दुर्लक्ष करून त्यांना छुपे समर्थन देण्याचे कामच आतापर्यंत होत राहिले. म्हणूनच अन्न, औषध प्रशासनातली ही भ्रष्टाचारी भेसळही दूर केली पाहिजे. खात्यांतर्गत कारभार तितकाच निर्भेळ करण्याची मोहीम मुंढे यांनी सुरू करावी.

**अन्नाला न जागणाऱ्यांकडून भेसळ**

साधारणपणे गेल्या महिनाभरापासून राज्यभरात वेगवेगळ्या ठिकाणी छापे टाकण्यात आले. अगदी वडापाव किंवा खाद्यपदार्थ बनवण्याच्या प्रक्रियेपासून ते दुधात बेमालूमपणे होणाऱ्या अत्यंत धोकादायक भेसळीविरोधात कारवाई होत गेली. त्यातले वास्तव पाहिल्यानंतर लोकांच्या रोजच्या जेवणाखाण्यातल्या या वस्तूंमध्ये विष पेरण्याचे कामच भेसळखोरांनी केलेले आहे, या मोहिमेदरम्यान जे भेसळखोर सापडले आहेत त्यांच्याविरुद्ध तितकीच कठोर कारवाई अपेक्षित असते. परंतु दुर्दैवाचा भाग असा आहे की भेसळखोरांविरुद्धचे कायदे अतिशय लेचेपेचे आहेत. कितीही मोठी कारवाई झाली तरी त्यातून सहिसलामत सुटण्याच्या अनेक पळवाटा उपलब्ध आहेत. जोपर्यंत कठोर शिक्षा होणे आणि अशांचे परवाने कायम स्वरूपी रद्द होणे या कारवाया तितक्याच धडाडीने होण्याची गरज आहे. जोपर्यंत मुंढे त्या खात्यामध्ये आहेत, तोपर्यंत ही धडक मोहीम सुरू राहील. त्यांच्यानंतर काय हा प्रश्न पुन्हा अनुत्तरीत राहणार आहे. खरे तर थेट मुख्यमंत्र्यांनी याची दखल घेऊन लोकांच्या दैनंदिन जगण्याच्या विषयाकडे गंभीरपणे लक्ष दिले पाहिजे. एकूणच अन्न, औषध प्रशासन विभागाची साफसफाई केली पाहिजे. मध्यंतरी मुख्यमंत्र्यांनी प्रत्येक विभागाला शंभर दिवसांच्या कामाचे उद्दिष्ट दिले होते. त्यात अन्न आणि औषध प्रशासनाने काय काम केले हेही कळू शकलेले नाही. सरकारकडून गलेलठ्ठ पगार घेतात, पण इतक्या महत्त्वाच्या जबाबदारीचेही भान ठेवत नाही. अन्नाला न जागणाऱ्यांमुळेच भेसळीचा हा हौदोस सुरू राहतो.

## सुविचार

**विलास कोळेकर**
**मालेवाडी, जि. सांगली.** मोबा.९४२२४२०६११

या जगात सगळ्यांवर लगेच विश्वास ठेवू नका. कारण इथे समजून घेणारे कमी आणि भडकावणारे जास्त आढळतात.

## पंचांग

**शुक्रवार, १९ जून २०२६**
**शक १९४८ पराभवनामसंवत्सर**

*** निज ज्येष्ठ शुक्ल पंचमी**
**नक्षत्र : आश्लेषा**

**-: जन्मराशी :-**
००-०१ ते १०-०६ कर्क
१०-०७ ते २४-०० सिंह

**रवी उदय- ०६-०३**
**रवी अस्त- १९-१७**

**संत मुक्तेश्वर महाराज पुण्यतिथी-तेरवाड**

मुद्रक, प्रकाशक **सौ. जयश्री रमाकांत खाडिलकर-पांडे** यांनी हे दैनिक नवाकाळ ऑफिस आणि नवाकाळ प्रेस करिता दांगट मीडिया प्रा.लि., पत्ताः प्लॉट नं. २२, दिघा एमआयडीसी, टीटीसी इंडस्ट्रीयल एरीया, विष्णू नगर, दिघा, नवी मुंबई -४००७०८ येथे छापून घेतले व नवाकाळ बिल्डिंग, १३ नवाकाळ पथ, खाडीलकर रोड, गिरगांव, मुंबई -४००००४ येथे प्रसिद्ध केले.
संपादक : **रोहित रमाकांत पांडे** • कार्यकारी संपादकः **समीर करंबे** (*पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी कार्यकारी संपादक यांच्यावर आहे.)

संपर्क : संपादक विभागः ८६५२२०१४४०,
जाहिरात विभाग : ८१०८११६४२३, ८१०८११६४२९,
छोट्या जाहिराती: ८४२२८१७४४५. वितरण विभाग : ९५९४९३६४४१
ई-मेलः contact@navakal.in
'नवाकाळ ऑफिस व नवाकाळ प्रेस'चे प्रकाशन दैनिक
'नवाकाळ' आर.एन.आय.क्र.१८१४/५७
स्थापना ७ मार्च १९२३/ फाल्गुन वद्य ५ शके १८४४

Printed and Published by **Jayshree Ramakant Khadilkar-Pande** On behalf of Navakal Office And Navakal Press. Printed at Dangat Media Pvt. Ltd., Address : Plot No.22, Digha M.I.D.C., TTC Industrial Area, Vishnu Nagar, Digha, Navi Mumbai - 400 708. Published at Navakal Building, 13 Navakal Path, Khadilkar Road, Girgaum, Mumbai - 400 004.
Editor - **Rohit Ramakant Pande** • Executive Editor - **Sameer Karambe** (*As per P.R.B. law Executive Editor will be responsible for all the content in Daily Navakal)

## पाककृती

### कारवारी फीश करी



★ **साहित्य** :- ७ रावसचे तुकडे, १ नारळ, ३ ते ४ लाल मिरच्या, १ टेबलस्पून धणे, १/२ टिस्पून हळद, ३ कप बारीक चिरलेले कांदा, १.५ टिस्पून किसलेले आले, ५ कोकम (आमसूल), २ टेबलस्पून तेल.

★ **कृती** :- प्रथम मासे स्वच्छ धुवून घ्या. नारळ फोडून तो खवनून घ्या. तो खवनलेले खोबरे, लाल मिरच्या, धणे बारीक वाटून घ्या. कांदा बारीक चिरा, आले किसून घ्या. आता गॅस पेटवा. त्यावर कढई ठेवा. कढईत तेल तापत ठेवा. तेल तापले की त्यात कांदा घाला, आले घालून छान परतून घ्या. त्यानंतर केलेले वाटण घाला. छान परतून घ्या. तेल सुटले की लगेचच पाणी घाला. आमसुले घाला, मीठ घाला नी ५ ते ७ मिनिटे उकळत ठेवा.

रस्सा उकळल्यावर त्यात माश्याचे तुकडे घाला नी ७ मिनिटे शिजवा. मासे शिजले आहेत. आता गॅस बंद करा. कारवारी रावस फिशकरी तयार आहे.

चपाती, भाकरी नी भात कशाबरोबरही छान लागते.

## क्रीडा

# इंग्लंड संघाची विजयासह दमदार सुरुवात

## हॅरीचे २ गोल! क्रोएशियाचा ४-२ ने दारुण पराभव

**फिफा विश्वचषकाच्या 'गट एल' मधील सामन्यात इंग्लंडने क्रोएशियाचा ४-२ असा पराभव करून मोठा विजय नोंदवला. ॲडलस स्टेडियमवर खेळल्या गेलेल्या या रोमांचक सामन्यात हॅरी केनने दोन, तर ज्यूड बेलिंगहॅम आणि मार्कस रॅशफोर्ड यांनी प्रत्येकी एक गोल केला. क्रोएशियाकडून मार्टिन बटुरिना आणि पीटर मोझेस यांनी गोल केले. परंतु ते संघाला पराभवापासून वाचवू शकले नाहीत.**



■ टेक्सास

**पहिल्या** हाफच्या ३६ व्या मिनिटाला क्रोएशियाने शानदार पुनरागमन केले. मार्टिन बटुरिनाने एक उत्कृष्ट गोल करून स्कोअर १-१ असा बरोबर केला. मात्र इंग्लंडने लवकरच प्रत्युत्तर दिले आणि हॅरी केनने ४२ व्या मिनिटाला आपला दुसरा गोल करून संघाला २-१ अशी आघाडी मिळवून दिली. इंग्लंड आघाडी घेऊन मध्यंतरासाठी जाईल असे वाटत असतानाच क्रोएशियाने अतिरिक्त वेळेत जोरदार प्रत्युत्तर दिले. पीटर मोझेसने ४५+५ व्या मिनिटाला गोल करून स्कोअर २-२ असा बरोबर केला. दोन्ही संघ याच स्कोअरवर मध्यंतरासाठी थांबले.

दुसरा हाफ सुरू होताच इंग्लंडने आपला हल्ला अधिक तीव्र केला. ४७ व्या मिनिटाला ज्युड बेलिंगहॅमने एक शानदार गोल करून इंग्लंडला ३-२ अशी आघाडी मिळवून दिली. या गोलनंतर क्रोएशिया बरोबरीच्या गोलसाठी प्रयत्न करत राहिला, पण इंग्लंडच्या बचावाने आपली पकड घट्ट ठेवली. सामन्याच्या अंतिम टप्प्यात क्रोएशियाने पुनरागमन करण्याचा प्रयत्न केला. परंतु ८५ व्या मिनिटाला मार्कस रॅशफोर्डने गोल करून इंग्लंडची आघाडी ४-२ अशी वाढवली. त्यानंतर क्रोएशियाला पुनरागमन करता आले नाही आणि इंग्लंडने सामना जिंकला. या विजयामुळे इंग्लंडने 'ग्रुप एल'मध्ये महत्त्वपूर्ण तीन गुण मिळवले, तर स्पर्धेत क्रोएशियाला मोठा धक्का बसला. १९६६ नंतर पहिल्या विश्वचषक विजेतेपदाच्या शोधात असलेल्या इंग्लंडसाठी हा विजय आत्मविश्वास वाढवणारा ठरला आहे. प्रशिक्षक थॉमस यांच्या मार्गदर्शनाखाली इंग्लंडने विश्वचषक स्पर्धेत दमदार सुरुवात करत प्रतिस्पर्धी संघांना इशारा दिला आहे.

**२० जूनला विश्वचषकाचे सामने**

| भारतीय वेळ | संघ |
|---|---|
| मध्यरात्री १२:३० | अमेरिका विरुद्ध ऑस्ट्रेलिया |
| पहाटे ३:३० | स्कॉटलंड विरुद्ध मोरोक्को |
| सकाळी ६:०० | ब्राझील विरुद्ध हैती |
| सकाळी ८:३० | तुर्कीये विरुद्ध पराग्वे |
| रात्री १०:३० | नेदरलँड विरुद्ध स्वीडन |

# कोलंबियाची विजयी सलामी
## उझबेकिस्तानला ३-१ने नमवले

■ मेक्सिको सिटी

**मेक्सिको** सिटीतील 'एस्तादियो इस्टेका' येथे झालेल्या फिफा विश्वचषकाच्या सलामीच्या सामन्यात कोलंबियाने उझबेकिस्तानचा ३-१ असा पराभव केला. या विजयासह कोलंबिया 'ग्रुप के'च्या गुणतालिकेत तीन गुणांसह अव्वल स्थानावर पोहोचला आहे.

पहिल्या हाफमध्ये ४० व्या मिनिटाला डॅनियल मुनोजने गोल करून कोलंबियाचे खाते उघडून संघाला १-० ची आघाडी मिळवून दिली. उझबेकिस्ताननेही गोल करण्यासाठी आपली ताकद झोकून दिली. मात्र या संघाला पहिल्या हाफमध्ये एकही गोल करता आला नाही. दुसऱ्या हाफमध्ये ६० व्या मिनिटाला उझबेकिस्तानच्या प्रयत्नांना यश आले. अब्बोसबेक फैजुल्लायेभने हेडद्वारे गोल करून उझबेकिस्तानसाठी विश्वचषक इतिहासातील पहिला गोल नोंदवला. या गोलसह उझबेकिस्तानने सामन्यात १-१ अशी बरोबरी साधली. या गोलनंतर लगेचच ६५ व्या मिनिटाला लुईस डियाझने गोल करुन कोलंबियाला पुन्हा २-१ अशी आघाडी मिळवून दिली. अतिरिक्त वेळेत (९०+८ मिनिटाला) जामिन्टन क्याम्पाजने तिसरा गोल नोंदवत कोलंबियाच्या ३-१ च्या विजयावर शिक्कामोर्तब केले.

# पुढील वर्षी आयपीएल स्पर्धा
## एक आठवडा आधी सुरू होणार

■ नवी दिल्ली

आयपीएलबाबत आज बीसीसीआयचे सचिव देवजीत सैकिया यांनी महत्त्वाची माहिती दिली. आयपीएलचा पुढील हंगाम एक आठवडा आधी सुरू होणार आहे. त्यासाठी घरगुती क्रिकेटच्या कॅलेंडरमध्ये काही बदल करावे लागू शकतात, असे त्यांनी सांगितले.

सैकिया यांनी असेही सांगितले की, वाढती उष्णता आणि मान्सूनपूर्व पावसामुळे आयपीएल लवकर सुरू होईल. त्याच्या तारखा १० मार्च ते १५ मे २०२७ असू शकतात. व्यस्त आंतरराष्ट्रीय वेळापत्रकामुळे लीगमधील सामन्याची संख्या वाढणार नाही. बीसीसीआय आणि आयपीएल गव्हर्निंग कौन्सिल यावर चर्चा करत आहेत. बोर्डाने गेम्स डेव्हलपमेंटचे महाव्यवस्थापक एबी कुरुविला यांनाही संभाव्य विंडो शोधण्याचे निर्देश दिले आहेत.

# पोर्तुगालचा ख्रिस्तियानो रोनाल्डो निष्प्रभ ठरला
## डीआर काँगोने सामना १-१ असा बरोबरीत राखला



■ ह्यूस्टन

**फिफा** विश्वचषकात पोर्तुगाल आणि डीआर काँगोचा सामना १-१ अशा रोमांचक बरोबरीत संपला. ह्यूस्टन स्टेडियमवर पोर्तुगालने सामन्याच्या सुरुवातीलाच आघाडी घेतली होती. मात्र डीआर काँगोने जोरदार पुनरागमन करून सामना बरोबरीत सोडवला. पोर्तुगालचा कर्णधार ख्रिस्तियानो रोनाल्डो संपूर्ण सामन्यात गोल करू शकला नाही. पोर्तुगालकडून जाओ नेवेसने आणि डीआर काँगोकडून योन व्हिसाने गोल केले.


पोर्तुगालने सामन्याच्या सुरुवातीपासूनच आक्रमक खेळ केला. सहाव्या मिनिटाला संघाला यश मिळाले, जेव्हा जोआओ नेव्हिसने एका शानदार हेडरने गोल करून पोर्तुगालला १-० अशी आघाडी मिळवून दिली. सुरुवातीच्या गोलनंतर पोर्तुगालने खेळावर नियंत्रण ठेवण्याचा प्रयत्न केला, तर दुसरीकडे डीआर काँगो बरोबरीच्या गोलसाठी आक्रमक खेळी सुरुच ठेवली होती. पहिल्या हाफच्या शेवटच्या क्षणांमध्ये योन व्हिसाने अतिरिक्त वेळेत (४५+५ मिनिटांवर) हेडरद्वारे गोल करून आपल्या संघाला १-१ अशी बरोबरी साधून दिली. यामुळे दोन्ही संघ समान गुणांसह मध्यंतरासाठी गेले. दुसऱ्या हाफमध्ये दोन्ही संघांनी आघाडी घेण्यासाठी अनेक प्रयत्न केले. परंतु कोणताही संघ निर्णायक गोल करू शकला नाही. रोनाल्डोसह अनेक खेळाडूंनी पोर्तुगालसाठी संधी निर्माण केल्या. तर डीआर काँगोने सतत दबाव कायम ठेवला. दोन्ही संघांच्या बचावफळीने उत्कृष्ट कामगिरी करून प्रतिस्पर्ध्यांचे हल्ले परतवून लावले.

# शेवटच्या अतिरिक्त वेळेत कॅलेबचा गोल
## घानाचा पनामावर १-० असा नाट्यमय विजय

■ टोरोंटो

**फिफा** विश्वचषकाच्या सलामीच्या सामन्यात घानाने पनामावर १-० असा नाट्यमय विजय मिळवला. सामन्याच्या दुसऱ्या हाफच्या अतिरिक्त वेळेत (९५ व्या मिनिटाला) कॅलेब यिरेंकीने केलेल्या एकमेव गोलने घानाला स्पर्धेत विजयी सुरुवात करून दिली. पावसाळी वातावरणात टोरोंटो येथील बीएमओ फिल्डवर खेळल्या गेलेल्या या सामन्यात दोन्ही संघांनी संयमी खेळ केला.

पहिल्या हाफमध्ये पनामाचा संघ अधिक आक्रमक दिसत होता. सामन्याच्या सुरुवातीलाच पनामाच्या



सेसिलिओ वॉटरमनने गोल करण्याचा प्रयत्न केला. परंतु घानाचा गोलकीपर लॉरेन्स अती-झिगीने तो अप्रतिम बचाव करत चेंडू अडवला. दुर्दैवाने या बचावादरम्यान झालेल्या धडकेमुळे अती-झिगीला दुखापत झाली आणि विश्रांतीनंतर त्याच्या जागी बेंजामिन असारे मैदानात उतरला. सामन्याचा उत्तरार्ध अधिक रोमांचक ठरला. ६५ व्या मिनिटाला घानाने संधी निर्माण केली होती, मात्र पनामाच्या बचावपटू जिओवानी रामोसने जॉर्डन अयूला गोल करण्यापासून रोखले. सामना बरोबरीत सुटणार असे वाटत असतानाच ९५ व्या मिनिटाला घानाच्या खेळाडूंनी चपळाई दाखवली. ब्रँडन थॉमस-असांतेने डाव्या बाजूने चेंडू घेऊन पनामाच्या बॉक्समध्ये एक अचूक क्रॉस मारला, ज्यावर कॅलेब यिरेंकीने गोल करत संघाला १-० ने विजय मिळवून दिला.

**MAHATRANSCO**
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

**E-TENDER 1st CALL NOTICE**

MSETCL invites online bids (E-Tender) from registered contractors agencies on Mahatransco E-Tendering website **https://srmetender.mahatransco.in/** for following works

| Sr. No. | RFX No. | E-Tender No. & Description of Material | Due date & Time (Hrs.) for submission & Opening of Tender |
|---|---|---|---|
| 1 | 7000040392 | **SE/EHV/O&M/CIR/KLW/TECH/ Ten-12(1st call)/26-27** E-Tender for Work of repair & upgradation of crimping tool at various substation & Line Sub-division under EHV (O&M) Circle Kalwa. | Tender Downloading Dates & time. Tender Sale period. From **Dt: 19.06.2026, 00:00 Hrs to Dt. 04.07.2026, 09:59 Hrs** **Technical Opening:- Dt. 04.07.2026 at 10:00 Hrs** (Onwards if possible) **Commercial Opening:- Dt. 04.07.2026 at 15:00 Hrs** (Onwards if possible) |
| | | **Tender Fee** | **Rs. 500 + GST** |
| | | **Estimated Cost** | **Rs. 48,45,263.00/-** |

**Contact Person:** Executive Engineer/ Dy. Exe. Engineer (O) Tel No. 7506379055
**Note :-** All eligible Suppliers / Contractors are mandated to get enrolled on SRM E-Tenders (New) portal of MSETCL.

**Sd/-**
**SUPERINTENDING ENGINEER**

**PUBLIC NOTICE**

NOTICE is hereby given to public at large that the undersigned Advocate is investigating the title of Mrs. Manisha S. Dhoot, aged about 51 years W/o Late Mr. Shyamsunder Dhoot, Indian Inhabitant, presently residing at Flat No. 101, Dahisar Bhushan CHSL, Plot No. B, Mhatre Wadi, Parab Kalsekar Road, Dahisar (W), Mumbai 400068 in respect of the property more particularly described in the schedule hereunder written.

All persons having or claiming any right, title, claim, demand or estate interest in respect of the said property or to any part thereof by way of sale, exchange, mortgage, let, lease, lien, charge, maintenance, license, gift, inheritance, share, possession, easement, trust, bequest possession, assignment or encumbrance of whatsoever nature or otherwise are hereby requested to intimate to the undersigned in writing at the address mentioned below of any such claim accompanied with all necessary and supporting documents within **14 days** from the date of publication hereof, failing which it shall be presumed that there are no claims and that claims, if any, have been waived off and the undersigned shall proceed to issue a Title Certificate in respect of the same.

**SCHEDULE OF PROPERTY**

Residential premise bearing Flat no. 101, admeasuring 90.78 sq. mtr build-up area on the 1st Floor, along with car parking space no. 2, Situated on Plot bearing Nos. B, in the building known as Dahisar Bhushan CHSL, Mhatre Wadi, Parab Kalsekar Road, Dahisar (W), Mumbai 400068 together with all and singular the right, interest and benefit as the member of the Society in the 5 shares of Rs.50/- each bearing distinctive nos. 1 to 5 (both inclusive) comprised in share certificate no.1 issued by Dahisar Bhushan CHSL, deposits, sinking fund and other funds appearing to the credit of the transferor in the account of the society, lying in MCGM R North Ward, on Plot bearing CTS No. 788 /1 Village Dahisar, Tal. Borivali Mumbai suburban District.

Date: 19.06.2026
Place : Mumbai

**Sd/-**
**Adv. Mr. Arun Nile**
**B / 207, Gopal CHSL, Ambadi Road, Opp. Corporation Bank, Vasai (W), Palghar 401202**

# लग्नानंतर २ महिन्यांत विवाहितेची आत्महत्या अंबरनाथ पूर्वेतील पारेगावातील घटना

■ अंबरनाथ

**लग्नानंतर** दोन महिन्यांतच हुंड्यासाठी सासरच्यांकडून होणाऱ्या छळाला कंटाळून २८ वर्षीय नवविवाहितेने राहत्या घरात गळफास घेऊन आत्महत्या केली. ही घटना अंबरनाथ पूर्वेतील पालेगाव येथे घडली.

विशाखा नितीन तीळकर असे आत्महत्या केलेल्या विवाहितेचे नाव आहे. याप्रकरणी शिवाजीनगर पोलिसांनी मृत मुलीच्या वडिलांच्या तक्रारीवरून पती, सासू आणि दीर यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.व्यवसायाने डॉक्टर असलेल्या पतीला अटक करण्यात आली, तर सासू आणि दीर सध्या फरार आहेत. पुण्याच्या आनंदनगर -हिंगणे खुर्द परिसरात रिक्षा चालवून कुटुंबाचा उदरनिर्वाह करणारे अनिल शिवाजीराव शिंदे यांनी आपली एकुलती एक मुलगी विशाखा हिचे लग्न २ महिन्यांपूर्वी अंबरनाथच्या पालेगाव येथील नितीन नामदेव तीळकर (३६) याच्याशी केले होते. लग्नानंतर काही दिवसांतच पेशाने डॉक्टर असलेल्या नितीनने माहेरून पाच तोळे सोने तसेच पैशांची मागणी करीत विशाखाचा शारीरिक आणि मानसिक छळ सुरू केला. असा आरोप मुलीच्या वडिलांनी केला.

# अल्पवयीन मुलाचे अपहरण करून हत्या सबळ पुराव्याअभावी आरोपीची सुटका

■ मुंबई

**नऊ** वर्षाच्या अल्पवयीन मुलाचे अपहरण करून त्याच्या हत्या केल्याच्या आरोपाखाली दोषी ठरवून जन्म ठेपेची शिक्षा ठोठावण्यात आलेल्या आरोपीला मुंबई उच्च न्यायालयाने दिलासा दिला. न्यायमूर्ती अजय गडकरी आणि न्यायमूर्ती रणजितसिंह राजा भोसले यांच्या खंडपीठाने सबळ पुराव्याअभावी आरोपीची जन्मठेपेची शिक्षा रद्द करून सर्व आरोपातून निर्दोष मुक्तता केली.

सत्र न्यायालयाने २०१७ मध्ये आरोपी वृषल मधुकर कलाणे याला जन्मठेपेची शिक्षा ठोठावली होती पुणे फुरसुंगी येथील एका नऊ वर्षाचा अल्पवयीन मुलगा २०१४ मध्ये अचानक बेपत्ता झाला. त्याचा मृतदेह नंतर बोपदेव घाटात सापडला होता. पोलिसांनी सोसायटीतील जुन्या वादाचा संदर्भ देत संशयाच्या आधारे वृषल आणि त्याच्या कुटुंबावर गुन्हा दाखल केला होता. पुणे सत्र न्यायालयाने आरोपीला २०१७ मध्ये दोषी ठरवून जन्मठेपेची शिक्षा ठोठावली. त्या विरोधात आरोपीने ॲड. राजू मोरे आणि ॲड रूपा सिंग यांच्यामार्फत उच्च न्यायालयात कपिल दाखल केले होते.

# मध्य प्रदेशातील ३.३ किलोच्या एका आंब्याला ३,८०० रुपयांचा भाव

■ अलीराजपूर

**मध्य** प्रदेशच्या अलीराजपूर जिल्ह्यातील कट्ठीवाडा भागात पिकवल्या जाणाऱ्या 'नूरजहाँ' या दुर्मिळ प्रजातीच्या एका आंब्याने यंदा ३.३ किलो वजनासह ३,८०० रुपयांचा उच्चांकी भाव मिळवला आहे. ही प्रजात मूळची अफगाणिस्तानची मानली जाते. भारतात केवळ कट्ठीवाडा भागातच तिची मोजकी झाडे उरली आहेत.

या आंब्याचे सरासरी वजन २ ते ३.५ किलोपर्यंत असू शकते. अनुकूल हवामान असल्यास एका आंब्याचे वजन तब्बल ४ किलोपर्यंतही जाते.नूरजहाँ आंबा साधारणपणे एक फूट किंवा त्याहून अधिक लांब असू शकतो. या आंबाला केवळ भारतातच नव्हे, तर अमेरिका, स्पेन आणि संयुक्त अरब अमिरातीमध्येही मोठी मागणी आहे. हवामानातील बदलांमुळे या आंब्याचे उत्पादन अत्यंत कमी आणि मर्यादित असते.

### ज्याच्याशी संबंधित आहे त्यांच्याकरिता

**याची नोंद घ्यावी की,** श्री. सौरभ सोमानी हे **(१) श्री.सुधीर कुमार गौती, (२) श्री.शिवम सुधीर गौती आणि (३) श्री.यश सुधीर गौती** यांच्याकडून मुंबई उपनगर या नोंदणी जिल्हा आणि उपजिल्ह्यातील, सीटीएस क्र.८३७ ते ८४०, महसूल गाव पोईसर, तालुका बोरिवली येथील जमिनीवर किंवा भूखंडावर बांधकामित **फ्लॅट क्र.४३०३, ४३ वा मजला, टॉवर बी, अल्पाइन सरोवा को.हौ.सो.लि., समता नगर, कांदिवली (पूर्व), मुंबई ४००१०१ (प्रिमायसेस)** ही निवासी प्रिमायसेस खरेदी करण्यासाठी वाटाघाटी करत आहेत.

**पुढे लक्षात घ्या की, कोणतीही व्यक्ती, संस्था** (आर्थिक किंवा अन्यथा) ज्यांचा **सदर प्रिमायसेस** संदर्भात वारसा, हिस्सा, विक्री, गहाणखत, भाडेपट्टा, धारणाधिकार, परवाना, भेटवस्तू, ताबा किंवा अधिभार यासारख्या कोणत्याही प्रकारे कोणताही दावा किंवा अधिकार असल्यास त्यांनी ही सूचना प्रकाशित झाल्यापासून **१४ (चौदा) दिवसांच्या** आत त्याचे/तिचे/त्यांचे असे दावे, जर असतील तर, **सर्व सहाय्यक कागदपत्रांसह,** अधोस्वाक्षरीकर्त्याला कळवणे आवश्यक आहे, अन्यथा अशा दाव्याचा संदर्भ न घेता व्यवहार पूर्ण केला जाईल आणि अशा व्यक्तीचे दावे, जर असतील तर, माफ केले जातील आणि ते कोणत्याही प्रकारे बंधनकारक नसतील असे मानले जातील.

**अनिल डी. पांडे - वकील**
कामधेनू असोसिएट्स - वकील आणि कायदेशीर सल्लागार
फ्लॅट क्र. १०३, १ला मजला, विंग सी, गोकुळ होरायझन,
गुंदेचा ट्रिलियम समोर, ठाकूर गाव, कांदिवली (पूर्व), मुंबई ४००१०१.

# निरा-बारामती मार्गावर एसटी बस आगीत खाक

■ बारामती

**निरा-बारामती** मार्गावरील खामगळपाटी परिसरात आज सकाळी धावत्या एसटी बसला अचानक आग लागल्याने खळबळ उडाली. चालकाच्या प्रसंगावधानामुळे सर्व प्रवाशांना वेळेत बाहेर काढण्यात यश आल्याने मोठी जीवितहानी टळली. मात्र या आगीत बस पूर्णपणे जळून खाक झाली असून एसटी महामंडळाचे सुमारे ४० लाख रुपयांचे नुकसान झाले.

निराहून बारामतीला जाणारी ही बस आज सकाळी सुमारे ६.१५ वाजण्याच्या सुमारास खामगळपाटी येथील खडी मशिनकडे पोहोचली असताना रस्त्याजवळ बसच्या इंजिनमधून धूर येऊ लागला. चालक धनंजय लिंबराज पवार यांनी तातडीने बस रस्त्याच्या कडेला थांबवून पाहणी केली असता इंजिनच्या खालच्या भागातून धूर व ज्वाळा दिसल्या. त्यामुळे चालक व वाहक यांनी तत्काळ सर्व प्रवाशांना सुरक्षितपणे बसबाहेर काढले. तसेच बसमधील अग्निशामक यंत्राच्या साहाय्याने आग विझविण्याचा प्रयत्न केला. मात्र ऑईल गळतीमुळे आग झपाट्याने पसरली.

# आता पुणे-शिर्डी दररोज धावणार नवी एक्स्प्रेस

■ पुणे

**पुणे** आणि शिर्डीदरम्यान दररोज धावणारी नवीन रेल्वे कालपासून सुरू झाली आहे. गाडी क्रमांक ११४२३ पुणे-साईनगर शिर्डी एक्स्प्रेस पुणे स्थानकावरून सकाळी ६.५५ वाजता सुटून दौंड, श्रीगोंदा, अहिल्यानगर, राहुरी आणि बेलापूरमार्गे दुपारी १२ वाजता शिर्डी येथे पोहोचेल. परतीच्या प्रवासात ११४२४ साईनगर शिर्डी-पुणे एक्स्प्रेस शिर्डीहून दररोज सायंकाळी ६.१० वाजता सुटेल. त्यानंतर बेलापूर, राहुरी, अहिल्यानगर, श्रीगोंदा रस्ता आणि दौंड स्थानकांवर थांबे घेत रात्री ११.५५ वाजता पुण्यात येईल, अशी माहिती रेल्वे बोर्डाचे संचालक संजय नीलम यांनी दिली.

# खड्डे दुरूस्तीसाठी ठेकेदाराला अतिरिक्त ४४ कोटी देण्याचा प्रस्ताव

**विरार**-वसई-विरार शहरात रस्त्यावरील खड्डे बुजविणाऱ्याला ठेकेदारांना अतिरिक्त ४४ कोटी रुपये देण्याचा पालिकेचा प्रयत्न फसला आहे. भाजपाने महासभेपाठोपाठ स्थायी समितीच्या बैठकीतही या प्रस्तावाला विरोध केल्याने तो स्थगित करण्यात आला आहे. वसई-विरार महापालिकेने खड्डे बुजविण्यासाठी अर्थसंकल्पात ५०२ कोटी ९६ लाख रुपयांची तरतूद केली आहे. मात्र ५ वर्षांच्या प्रशासकीय काळात ५४७ कोटी ८८ रूपये खर्च करण्यात आले होते. या वाढीव ४४ कोटी ९२ लाख रुपयांच्या खर्चाला कार्योत्तर मंजुरी देण्याचा प्रस्ताव महासभेत ठेवण्यात आला होता. त्याला भाजपाने महासभेत जोरदार विरोध केला होता. लोकभावना आणि विरोध पाहून महापौरांनी तो प्रस्ताव मागे घेतला होता.

**भाजपाच्या विरोधामुळे ठराव स्थगित**

# तालिबानचा नवा फतवा! सरकारी कर्मचाऱ्यांना स्मार्टफोन वापरावर बंदी

**काबूल** - अफगाणिस्तानमधील तालिबान सरकारने कठोर आदेश जारी करत सरकारी कर्मचाऱ्यांच्या स्मार्टफोन वापरावर बंदी घातली. तालिबानच्या लष्करी न्यायालयाच्या आदेशानुसार नियमांचे उल्लंघन करणाऱ्या कर्मचाऱ्यांचे फोन जप्त करून नष्ट केले जातील. त्यांच्यावर लष्करी न्यायालयात कारवाईही केली जाऊ शकते. ही बंदी केवळ कार्यालयापुरती मर्यादित नसून कर्मचाऱ्यांना घरातही स्मार्टफोन वापरण्यास मनाई केली आहे. या आदेशानुसार, तालिबान लष्करी न्यायालयाच्या उपप्रमुखांनी आठ क्षेत्रांतील लष्करी न्यायालयांच्या प्रमुखांना त्यांच्या-त्यांच्या प्रांतांमध्ये हा आदेश लागू करण्याचे निर्देश दिले आहेत.

### जाहीर सूचना

तमाम सर्वसाधारण जनतेस याद्वारे सूचना देण्यात येते की, माझे अशील ४१, महंत रोड, विलेपार्ले पूर्व, मुंबई ४०००५७ येथे स्थित "चमारिया निवास" या इमारतीमधील १ ल्या मजल्यावरील सदनिका क्र. १०३, मोजमाप १३९० चौ.फू. रेरा कार्पेट क्षेत्रफळ व त्यासह २ कार पार्किंग जागा सदनिकेचे मालक श्री. राजिव अगरवाल यांच्याकडून खरेदी करण्याकरिता बोलणी करीत आहेत.

निम्न उल्लेखित सदनिकेच्या संदर्भात विक्री, देवाणघेवाण, गहाणवट, प्रभार, भेट, न्यास, ताबा, वारसा, संप्रेषण, धारणाधिकार, वहिवाट, मृत्युपत्र या मार्गे किंवा अन्य कोणत्याही प्रकारे कोणताही हक्क, शीर्षक, लाभ आणि/किंवा हितसंबंध असणाऱ्या, तसा दावा असणाऱ्या कोणीही/ सर्व व्यक्ती आणि/ किंवा वित्तीय संस्था यांनी त्याबाबत लेखी स्वरुपात, दाव्याच्या पृष्ठ्यर्थ सर्व नोंदणीकृत कागदपत्रांच्या नोटरीकृत सत्य प्रतींसह ॲडव्होकेट, **श्री. दिपेश जे. सांचला** यांचे कार्यालय क्र. ए-०२, तळमजला, आलोक अपार्टमेन्ट सीएचएसएल, महंत रोड विस्तारित, विलेपार्ले पूर्व, मुंबई ४०००५७ येथील कार्यालयात या सूचनेच्या प्रसिद्धी दिनांकापासून १४ दिवसांच्या कालावधीमध्ये कळवावे, अन्यथा असे सर्व दावे, हक्क, शीर्षक, लाभ आणि/किंवा हितसंबंध जर असल्यास, पुढील कोणत्याही सूचनेशिवाय सोडून दिले आणि/ किंवा माफ केले असे समजण्यात येईल.

**मालमत्तेची अनुसूची**

मुंबई उपनगर जिल्ह्याच्या नोंदणीकरण जिल्हा आणि उप जिल्ह्यामधील टीपीएस। चा अंतिम प्लॉट क्र. ५८ धारण केलेल्या, सुसंगत सीटीएस क्र. ९३१, ९३१/१ आणि २ किंवा साधारण जवळपासचा धारण केलेल्या, गाव विलेपार्ले पूर्व, तालुका अंधेरी येथे असलेल्या वसलेल्या आणि स्थित जमिनीच्या भूखंडावर बांधलेली, ४१, महंत रोड, विलेपार्ले पूर्व, मुंबई ४०००५७ येथे स्थित "चमारिया निवास" या इमारतीमधील १ ल्या मजल्यावरील सदनिका क्र. १०३, मोजमाप १३९० चौ.फू. रेरा कार्पेट क्षेत्रफळ व त्यासह २ कार पार्किंग जागा आणि सदर इमारतीचे बृमुंमपाद्वारे पारित बांधकाम भोगवटा प्रमाणपत्र आणि इमारत पूर्तता प्रमाणपत्रानुसार दि. २८.०४.२०२३ रोजी पूर्ण झाले आहे.

दिनांकः १९.०६.२०२६
सही/-
(श्री. दिपेश जे. सांचला)
वकील

### जाहीर सूचना

याद्वारे सर्व संबंधितांना सूचित करण्यात येते की, श्रीमती नीला सुनील खाडीकर व इतर 2 जण यांनी सर्व्हे क्र. 22/8 मधील 404.02 चौ. मी. क्षेत्रफळाच्या 12 मीटर विकास आराखडा रस्त्याचे आरक्षण कुळगाव-बदलापूर नगरपरिषदेकडे हस्तांतरित करण्याबाबत दिनांक 26/02/2026 रोजी प्रस्ताव सादर केला होता. सदर अर्जाच्या अनुषंगाने त्यांच्या नावे दिनांक 16 जून 2026 रोजी इरादा पत्र (एलओआय) देखील जारी करण्यात आले आहे. त्यामुळे, खालील अनुसूचीत नमूद केलेल्या मालमत्तेमध्ये किंवा त्यासंबंधी विक्री, अदलाबदल, गहाण, भेट, विश्वस्त व्यवस्था, वारसा, भाडेकरार, ताबा, वापर, परवाना, पट्टा, धारणाधिकार, भार, सुखभोग हक्क, वास्तव्य हक्क अथवा इतर कोणत्याही प्रकारचा हक्क, दावा किंवा स्वारस्य असलेल्या कोणत्याही व्यक्तीने किंवा कायदेशीर वारसाने, त्यासंबंधीचे कागदोपत्री पुरावे जोडून आपला दावा लेखी स्वरूपात अधोहस्ताक्षरी यांच्याकडे खाली नमूद केलेल्या पत्त्यावर या सूचनेच्या प्रसिद्धीपासून 15 दिवसांच्या आत सादर करावा.

अन्यथा, सदर मालमत्तेवर कोणाचाही कोणताही दावा किंवा स्वारस्य अस्तित्वात नाही असे मानण्यात येईल आणि संबंधित जमीन मालकांच्या नावे टिडीआर कार्यवाही सुरू करण्यात येईल.

**गाव : कात्रप, ता. : अंबरनाथ, जिल्हा : ठाणे येथे स्थित मालमत्ता**

| सर्व्हे क्र./ सीटीएस क्र. | क्षेत्रफळ | आरक्षण |
|---|---|---|
| सर्व्हे क्र. 22, हिस्सा क्र. 8 | 620 चौ. मी., त्यापैकी 12 मीटर डी.पी. रस्त्याखाली बाधित क्षेत्रफळ 404 चौ. मी. | 12 मीटर डी.पी. रस्ता |

**ॲड. अभिनव तयडे**
कार्यालयाचा पत्ता : 103, जानकी निवास, डॉ. मूस रोड, गडकरी रंगायतनजवळ, नौपाडा, ठाणे (पश्चिम), ठाणे, महाराष्ट्र - 400602
संपर्क : 9833581369

### जाहीर सूचना

याद्वारे सूचना देण्यात येते की, माझी अशील **श्रीमती जोसेफिन डी'क्रूझ** उर्फ **श्रीमती जोसेफिन निर्मला फर्नांडिस**, या **फ्लॅट क्र.ए-१३**, ३रा मजला, **मागरिट हाऊस, मागरिट कोहौसोलि**, मोजमाप क्षेत्रफळ ६५० चौ. फूट बिल्ट अप क्षेत्र, सीटीएस क्र. ५२ असलेल्या जमिनीवर बांधकामित व **एस. एम. रोड, वडाळा (पूर्व), एफ/एन वॉर्ड, मुंबई – ४०००३७** येथे स्थित असलेल्याचे (यापुढे सदर फ्लॅट असा उल्लेख) मालक आहेत, ज्याचे **मे. रूप कन्स्ट्रक्शन कंपनी आणि श्री. जोस रोझारिनो बॅरोस** यांच्यात सन १९६६ मध्ये करण्यात आलेले वाटपपत्र / विक्री करारनामा तसेच **श्री. जोस रोझारिनो बॅरोस आणि श्री. सॅनफोर्ड लॉरेन्स मॅरिओ अन्ताओ** यांच्यात सन १९८७ मध्ये करण्यात आलेला विक्री करारनामा हे मूळ दस्तऐवज हरवले / गहाळ झाले असून सापडत नाहीत.

कोणा व्यक्तिस सदर फ्लॅट किंवा त्याच्या कोणत्याही भागाबाबत विक्री, देवाणघेवाण, गहाणखत, शुल्क, भेटवस्तू, ट्रस्ट, वारसा, ताबा, भाडेपट्टा, उप-भाडेपट्टा, नियुक्ती, हस्तांतरण, वहिवाट, उप-वहिवाट, मृत्युपत्र, उत्तराधिकार, परवाना, देखभाल, प्रलंबित खटले, कर्ज, अग्रिम, धारणाधिकार, तारण, आदेश, कोणत्याही न्यायालयाने दिलेले किंवा जारी केलेले निर्णय किंवा हुकूम, कर किंवा महसूल किंवा वैधानिक अधिकारी, जोडणी, तडजोड किंवा अन्यथा कसेही याद्वारे माझ्या अशिलांकडून घेतलेल्या कर्जाबद्दल कोणताही दावा असल्यास किंवा कोणताही आक्षेप असल्यास त्यांनी खालील स्वाक्षरीकर्त्यास **बी/१०६, १ला मजला, सय्यद मंझिल कोहौसो लिमिटेड, पंडित दिनदयाल नगर, बसिन कॅथोलिक बँक लिमिटेड समोर, माणिकपूर, वसई (पश्चिम), जिल्हा पालघर-४०१२०२** येथे या तारखेपासून **१४ दिवसांच्या** आत वैध कागदोपत्री पुराव्यांसह ते लेखी स्वरूपात कळवणे आवश्यक आहे, अन्यथा असे गृहीत धरले जाईल की कोणतेही दावे अस्तित्वात नाहीत आणि ते, जर असतील तर, माफ केलेले किंवा सोडून दिलेले मानले जातील.

मुंबई, आज दिनांकित १९ जून २०२६
**सही/-**
**डेव्हिड एस. डाबरे**
**वकील उच्च न्यायालय, मुंबई**

### PUBLIC NOTICE

Notice is hereby given that my client proposes to purchase all right, title and interest of M/s. Satguru's Aluminium Frames & Moulding Co. (Partnership Firm) in Unit No. 203, 2nd Floor, Navnidhi Industrial Estate, Acharya Donde Marg, Sewri (West), Mumbai – 400 015, together with all appurtenant rights and interests ("the Said Premises").

All persons, entities, banks, financial institutions, creditors, claimants, legal heirs, successors or any other party having or claiming any right, title, interest, demand, encumbrance or objection of any nature whatsoever whether by sale, agreement, transfer, mortgage, charge, lien, lease, tenancy, inheritance, partition, court decree, attachment, statutory dues or otherwise are hereby called upon to intimate the same in writing, with supporting documents, to the undersigned within 7 (seven) days of publication of this Notice. Any person claiming through a deceased person must also furnish full particulars and documentary proof within the said period. Any pending suits, proceedings, injunctions, attachments or litigation affecting the Said Premises must likewise be disclosed.

Failure to do so within the stipulated period shall be treated as waiver and/or abandonment of such claim, and my client shall proceed to complete the transaction without further reference, bearing no liability thereafter. All rights of my client are expressly reserved.

Place: Mumbai
Date: 19/06/2026

Sd/-
Akash P. Shah
Advocate, High Court
304, Yashwant Chambers, 18-B, Bharucha Marg, Fort, Mumbai – 400 023
akashshahoffice@gmail.com, 9920350289

## बृहन्मुंबई महानगरपालिका

(जल अभियंता विभाग)

क्र. उपजअभि/पीपीसी/१९२०/पांजरापूर दि. १७.०६.२०२६

### ई-निविदा सूचना

बृहन्मुंबई महानगरपालिकेचे आयुक्त खालील कामांकरिता पात्र बोलीदारांकडून "बाब दर तत्त्वावर" ऑनलाईन निविदा मागवित आहेत. बोली सुरुवात दिनांक आणि वेळ आणि बोली समाप्ती दिनांक आणि वेळ बृ.मुं.म.पा.च्या वेबसाईटवर निविदा विभागाअंतर्गत सविस्तर निविदा सूचनेमध्ये नमूद करण्यात आले आहे.

| अ. क्र. | बोली क्र. | कामाचे नाव |
|---|---|---|
| १ | २०२६_बृमुंमपा_ १३०८६७७_१ | पांजरापूर पंपिंग स्टेशन येथे स्टेज-I ॲडिशनल कॅपॅसिटर बँककरिता व्हॅक्युम कॉन्टॅक्टर्स बदलणे. |
| २ | २०२६_बृमुंमपा_ १३०८७२७_१ | पांजरापूर पंपिंग स्टेशन येथे स्टेज-II पम्प्स करिता ४ यांत्रिक सीलचा पुरवठा. |

इच्छुक निविदाकारांनी निविदेच्या अधिक तपशीलाकरिता महापालिका वेबसाईट **http://portal.mcgm.gov.in** येथे भेट द्यावी.

सही/-
**कार्यकारी अभियंता**
**(एमऑण्डई) पांजरापूर**

पीआरओ/६०८/जाही./२०२६-२७

स्वमर्जीने औषधोपचार करू नका

## e-TENDER NOTICE

MAHATRANSCO
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

MSETCL invites online bids (e-Tender) from reputed and registered contractors on Mahatransco e-Tendering Website **https://srmetender.mahatransco.in/** for the following Tender specification.

| RFX | Description | Esti. Cost |
|---|---|---|
| Tend-12/26-27 7000040372 | AMC for attending emergency breakdown, planned maintenance activities and restoration of collapse tower of 220kV & 100kV Lines as & when required at EHV Line maintenance sub - division, Dombivali under EHV (O&M) Circle, Panvel. **Tender Fee Rs. 5000/- + GST** | **Rs. 118.00 Lakhs including GST** |

EMD 1% of estimated cost. **Submission of bids from 18.06.2026 at 11:00 Hrs. to 03.07.2026 up to 15:00 hrs, Opening date :- 03.07.2026 @ 15:30 Hrs.**
For further details visit our website **https://srmetender.mahatransco.in/**
**Contact Person :** The Executive Engineer (Adm)
Mob. No. 8412050202. E-mail ID **se7200@mahatransco.in**

**Sd/-**
**Superintending Engineer**
**EHV (O&M) Circle, Panvel**

## ई-निविदा सूचना

महावितरण

दि. १९.०६.२०२६ पासून महावितरणतर्फे कणकवली विभागाअंतर्गत असणाऱ्या रोहित्र ब्रेकडाऊन दुरुस्तीच्या कामासाठी एक वर्षाच्या करारावर परवानाधारक विद्युत ठेकेदारांची नामिका प्रविष्ठ (empanellment) करण्यासाठी स्वतंत्र निविदा क्र. **EE/KVL/T/BMDTC/T-02 OF 2026-27** मागविण्यात येत आहे.

सदर निविदेकारिता बयाणा शुल्क रु.१०,०००/- निश्चित करण्यात आलेली आहे. सविस्तर ई-निविदा **https://works.mahadiscom.in/eTender/etender** संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात येत आहेत. ई-निविदा भरण्याची अंतिम मुदत दि. २९.०६.२०२६ वेळ २३:०० अशी आहे. सदर निविदांचे शुल्क व लागू असणारे बयाणा शुल्क ऑनलाईन पध्दतीने तसेच DD ने कणकवली विभागाच्या नावे स्विकारले जातील. अधिक माहितीसाठी विभागीय कार्यालय, कणकवली फोन न. ७८७५७६५०८१ यांचेशी संपर्क साधावा.

**PRO NO- KZR/४७/२०२६-२७**
**दि.१६.०६.२०२६**

**कार्यकारी अभियंता**
**म.रा.वि.वि.कं. मर्या. कणकवली विभाग, कणकवली.**

## उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर

### फेर ई-निविदा सुचना (सन २०२६-२०२७)

उल्हासनगर महापालिका, उल्हासनगर, जि. ठाणे सन २०२६-२०२७ साठी जोडपत्र 'Annexure - II' मध्ये नमुद केलेली मशिनरी / वाहने पुरविणे व काम करुन घेण्यासाठी अनुभवी अभिकर्ता/निविदाकार यांचेकडून ई-टेंडर दोन लिफाफा पध्दतीने जाहिर निविदा https://mahatender.gov.in या वेबसाइट वरुन मागवित आहे.

| अ. क्र. | कामाचे नांव | निविदा रक्कम रुपये | निविदा अनामत रक्कम (EMD) | कोरी निविदा फॉर्म फी | सुरक्षा अनामत रक्कम | निविदा कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | मनुष्यबळाद्वारे शहरातील लहान नाले/गटारे/कल्व्हर्ट सफाई करणे व तसेच पोकलेन व जेसिबी मशिनद्वारे मोठया/छोटया नाल्याची सफाई करुन निघालेला कचरा / गाळ यांची डंपरद्वारे वाहतुक डंपिंग ग्राऊंडवर करणेबाबतच्या पावसाळ्यापुर्वी नालेसफाईच्या कामाच्या प्रस्तावास मान्यता मिळणेबाबत. | Rs. 1,96,95,000/- | Rs. 1,97,000/- | (19700 + (18% GST 3546) = Rs. 23246/- | निविदा कार्यादेशाच्या किंमतीवर ५% | १२० दिवस |

१) निविदा विक्री व स्विकृती दि. १९/०६/२०२६ ते ०६/०७/२०२६ रोजी दुपारी ३:०० वाजेपर्यंत राहील.
२) सदर निविदेची सविस्तर माहिती https://mahatender.gov.in या वेबसाईटवरुन विक्री व स्विकृती करता येतील.
३) निविदा पूर्व बैठक दिनांक २५/०६/२०२६ रोजी दुपारी १२:०० वाजता अतिरीक्त आयुक्त उल्हासनगर महानगरपालिका यांच्या दालनात घेतली जाईल.

आलेल्या एक अथवा सर्व निविदा कोणतेही कारण न देता नाकारण्याचा अधिकार आयुक्त उल्हासनगर महानगरपालिका उल्हासनगर यांनी राखून ठेवलेला आहे.

जा.क्र.उमपा/पीआरओ/७७२/२०२६
दि. १८/०६/२०२६

सही/-
उप-आयुक्त
उल्हासनगर महानगरपालिका

## महाराष्ट्र शासन

### कार्यकारी अभियंता, एकात्मिकृत घटक (सा.बां.) विभाग, यांचे कार्यालय

Email :- integratedmumbai.ee@mahapwd.gov.in
दुरध्वनी क्र. २२०१६९७४ फॅक्स क्र. २२०१६९७६

### ई-निविदा सुचना क्र. २७ सन २०२६-२७

कार्यकारी अभियंता, एकात्मिकृत घटक (सा. बां.) विभाग, फोर्ट, मुंबई-०१ ( दुरध्वनी क्र. ०२२-२२०१६९७४-७६) महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम खात्याकडून योग्यत्या वर्गातील नोंदणीकृत **मजूर सहकारी संस्थांकडून (फक्त बृहन्मुंबई शहर)** खालील कामांकरीता **"ब-१"** नमुन्यातील निविदा ई-निविदा प्रणालीव्दारे (ऑनलाईन) निविदा मागवित आहोत. निविदा कागदपत्र शासनाच्या संकेतस्थळावर http://mahatenders.gov.in येथून डाऊनलोड करण्यांत यावी. तसेच निविदा स्विकारण्याचा अथवा नाकरण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता, एकात्मिकृत घटक (सा.बां.) विभाग, फोर्ट, मुंबई, यांनी राखून ठेवला आहे. अट असलेली निविदा स्विकारली जाणार नाही.

| अ. क्र. | कामाचे नाव | अंदाजित रक्कम रुपये |
|---|---|---|
| १ | सर जे.जे. ग्रुप ऑफ हॉस्पिटल्स, मुंबई येथे मुख्य इमारतीपासून 'मल्टी स्पेशालिटी विभागापर्यंत आणि मुख्य इमारतीपासून 'तितली गार्डन'पर्यंत विद्युत वाहिन्यांसाठी सिमेंट कॉंक्रीट पुरवणे व अंथरून बसवणे. | १८४७९७९/- |
| २ | सर जे. जे. ग्रुप ऑफ हॉस्पिटल्स, मुंबई येथे 'एफ/एस मल्टी स्पेशालिटी' ते मीटर रूम आणि 'बैठी चाळ' ते क्रिकेट मैदान या दरम्यान विद्युत वाहिन्यांसाठी सिमेंट कॉंक्रीट पुरवणे व अंथरणे. | १८३४१५४/- |
| ३ | सर जे. जे. रुग्णालय संकुल, मुंबई येथील शवगृहाच्या इमारतीमधील पहिल्या मजल्यावर असलेल्या नमुना संकलन कक्षात (पॅथॉलॉजी विभाग) खिडक्या, लाकडी छत आणि जलरोधक कामांमध्ये (वॉटरप्रूफिंग) बदल व नूतनीकरण करणे. | ३३७९२७५/- |
| ४ | सर जे.जे. ग्रुप ऑफ हॉस्पिटल्स, मुंबई येथील मुख्य इमारतीवरील (मुख्य ऑपरेशन थिएटरच्या वर) प्लॅटफॉर्मसह असलेल्या ओव्हरहेड एचडीपीई (HDPE) पाण्याची टाकी, सॅनिटरी पाईप आणि फिटिंग्ज यांच्या दुरुस्तीचे काम. | १२१९७८८/- |
| ५ | मुंबईतील कामा आणि अल्ब्लेस हॉस्पिटलमधील जीएमसी (GMC) अंतर्गत येणाऱ्या नवीन रुग्णालय इमारतीचा टेरेस (मोकळी जागा), लिफ्ट रूम आणि पाण्याची टाकी यांवर वेदर शेड (संरक्षक छत) पुरवणे व उभारणे. | १६९५९३४/- |
| ६ | मुंबई येथील सर जे.जे. ग्रुप ऑफ हॉस्पिटल्सच्या आवारातील जुन्या इमारतीच्या दर्शनी भागातील विद्यार्थिनी आणि महिला डॉक्टर विद्यार्थ्यांसाठीच्या निवास व विश्रांती कक्षांमधील (rooms / rest rooms) फ्लोअरिंग आणि 'डॅडो' (भिंतीचे खालचे आवरण) बदलून ते इटालियन प्रकारात रूपांतरित करणे. | ४९७५०३९/- |

**(एकूण ०६ कामे )**

ई-निविदा उपलब्ध कालावधी : दिनांक १८/०६/२०२६ सकाळी १०.३० पासून ते दिनांक २५/०६/ २०२६ रोजी १५.०० पर्यंत
ई-निविदा उघडणे (शक्य झाल्यास) : दिनांक २९/०६/२०२६ रोजी १५.०५ वाजता

खालील संकेतस्थळावरून ई-निविदाची सर्व माहिती उपलब्ध आहे.
१. **http://mahapwd.gov.in** २. **http://mahatenders.gov.in**
(सदर निविदेसूचनेमध्ये काही बदल होत असल्यास वरील वेब साईटवरती कळविण्यात येईल.)
३. कार्यकारी अभियंता, एकात्मिकृत घटक (सा.बां) विभाग, फोर्ट, मुंबई कार्यालयातील सूचना फलक.

**जा.क्र.एघ (सा.बां.)/निविदा/** ३६५३
कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय,
एकात्मिकृत घटक (सा. बां.) विभाग,
बांधकाम भवन, २ रा मजला,
२५ मर्झबान पथ, फोर्ट, मुंबई - ४०० ००१.
दूरध्वनी क्र. ०२२ -२२०१६९७४/७६
दिनांक : १७ -६-२०२६

सही/-
कार्यकारी अभियंता,
एकात्मिकृत घटक (सा. बां.) विभाग,
फोर्ट, मुंबई.

क्रमांकः आरओसी- २०२६-२७/ क्र.-५/ सी ११९१

### जाहीर सूचना

तमाम सर्वसाधारण जनतेस याद्वारे सूचना देण्यात येते की, माझे अशील फिरोज शाह रोड, सांताक्रुझ पश्चिम, मुंबई ४०००५४ येथे स्थित असलेल्या अचरत बाग को-ऑपरेटिव्ह हौसिंग सोसायटी लिमिटेड या संस्थेच्या डी विंग मधील ६ व्या मजल्यावरील सदनिका क्र. ६०२, मोजमाप ८९३ चौ.फू. कार्पेट क्षेत्रफळ आणि समतूल्य ९४१ चौ.फू. रेरा कार्पेट क्षेत्रफळ ही सदनिका व त्यासह १ कार पार्किंग जागा सदनिकेचे मालक म्हणजेच श्री. सुरेंद्र गांडालाल शाह यांच्याकडून खरेदी करण्याकरिता बोलणी करीत आहेत.

निम्न उल्लेखित सदनिकेच्या संदर्भात विक्री, देवाणघेवाण, गहाणवट, प्रभार, भेट, न्यास, ताबा, वारसा, संप्रेषण, धारणाधिकार, वहिवाट, मृत्युपत्र या मार्गे किंवा अन्य कोणत्याही प्रकारे कोणताही हक्क, शीर्षक, लाभ आणि/किंवा हितसंबंध असणाऱ्या, तसा दावा (मालकांनी स्टेट बँक ऑफ इंडिया, ऑगस्ट क्रांती मैदान शाखा येथून घेतलेल्या कर्ज खाते क्र. ४१५३१९४५९७६ धारण केलेल्या कर्जासह आणि त्या व्यतिरिक्त) असणाऱ्या कोणीही/ सर्व व्यक्ती आणि/ किंवा बँक/बँका आणि/ किंवा वित्तीय संस्था यांनी त्याबाबत लेखी स्वरुपात, दाव्याच्या पृष्ठ्यर्थ सर्व नोंदणीकृत कागदपत्रांच्या नोटरीकृत सत्य प्रतींसह ॲडव्होकेट, **श्री. दिपेश जे. सांचला** यांचे कार्यालय क्र. ए-०२, तळमजला, आलोक अपार्टमेन्ट सीएचएसएल, महंत रोड विस्तारित, विलेपार्ले पूर्व, मुंबई ४०००५७ येथील कार्यालयात या सूचनेच्या प्रसिद्धी दिनांकापासून १४ दिवसांच्या कालावधीमध्ये कळवावे, अन्यथा असे सर्व दावे, हक्क, शीर्षक, लाभ आणि/किंवा हितसंबंध जर असल्यास, पुढील कोणत्याही सूचनेशिवाय सोडून दिले आणि/ किंवा माफ केले असे समजण्यात येईल.

**मालमत्तेची अनुसूची**

मुंबई उपनगर जिल्ह्याच्या नोंदणीकरण जिल्हा आणि उप जिल्ह्यामधील टीपीएस सांताक्रुझ क्र.। चा अंतिम प्लॉट क्र. ६६ किंवा साधारण जवळपास धारण केलेल्या, फिरोज शाह रोड, सांताक्रुझ पश्चिम, मुंबई ४०००५४ येथे स्थित असलेल्या अचरत बाग को-ऑपरेटिव्ह हौसिंग सोसायटी लिमिटेड या संस्थेच्या डी विंग मधील ६ व्या मजल्यावरील सदनिका क्र. ६०२, मोजमाप ८९३ चौ.फू. कार्पेट क्षेत्रफळ आणि समतूल्य ९४१ चौ.फू. रेरा कार्पेट क्षेत्रफळ ही सदनिका व त्यासह १ कार पार्किंग जागा आणि सदर इमारतीचे बृमुंमपाद्वारे पारित बांधकाम भोगवटा सह इमारत पूर्तता प्रमाणपत्रानुसार वर्ष २०२४ (दि. २४.०४.२०२४) रोजी पूर्ण झाले आहे.

दिनांकः १९.०६.२०२६
सही/-
(श्री. दिपेश जे. सांचला)
वकील

### जाहीर सूचना

तमाम सर्वसाधारण जनतेस याद्वारे सूचना देण्यात येते की, माझे अशील फिरोज शाह रोड, सांताक्रुझ पश्चिम, मुंबई ४०००५४ येथे स्थित असलेल्या अचरत बाग को-ऑपरेटिव्ह हौसिंग सोसायटी लिमिटेड या संस्थेच्या डी विंग मधील ६ व्या मजल्यावरील सदनिका क्र. ६०३, मोजमाप ८३४ चौ.फू. कार्पेट क्षेत्रफळ आणि समतूल्य ७७.४८ चौ.मी. रेरा कार्पेट क्षेत्रफळ ही सदनिका व त्यासह १ कार पार्किंग जागा सदनिकेचे मालक म्हणजेच (१) श्री. कौशल शाह आणि (२) श्री. सुरेंद्र शाह यांच्याकडून खरेदी करण्याकरिता बोलणी करीत आहेत.

निम्न उल्लेखित सदनिकेच्या संदर्भात विक्री, देवाणघेवाण, गहाणवट, प्रभार, भेट, न्यास, ताबा, वारसा, संप्रेषण, धारणाधिकार, वहिवाट, मृत्युपत्र या मार्गे किंवा अन्य कोणत्याही प्रकारे कोणताही हक्क, शीर्षक, लाभ आणि/किंवा हितसंबंध असणाऱ्या, तसा दावा (मालकांनी स्टेट बँक ऑफ इंडिया, ऑगस्ट क्रांती मैदान शाखा येथून घेतलेल्या कर्ज खाते क्र. ४१५३१९४५९७६ धारण केलेल्या कर्जासह आणि त्या व्यतिरिक्त) असणाऱ्या कोणीही/ सर्व व्यक्ती आणि/ किंवा बँक/बँका आणि/किंवा वित्तीय संस्था यांनी त्याबाबत लेखी स्वरुपात, दाव्याच्या पृष्ठ्यर्थ सर्व नोंदणीकृत कागदपत्रांच्या नोटरीकृत सत्य प्रतींसह ॲडव्होकेट, **श्री. दिपेश जे. सांचला** यांचे कार्यालय क्र. ए-०२, तळमजला, आलोक अपार्टमेन्ट सीएचएसएल, महंत रोड विस्तारित, विलेपार्ले पूर्व, मुंबई ४०००५७ येथील कार्यालयात या सूचनेच्या प्रसिद्धी दिनांकापासून १४ दिवसांच्या कालावधीमध्ये कळवावे, अन्यथा असे सर्व दावे, हक्क, शीर्षक, लाभ आणि/किंवा हितसंबंध जर असल्यास, पुढील कोणत्याही सूचनेशिवाय सोडून दिले आणि/ किंवा माफ केले असे समजण्यात येईल.

**मालमत्तेची अनुसूची**

मुंबई उपनगर जिल्ह्याच्या नोंदणीकरण जिल्हा आणि उप जिल्ह्यामधील टीपीएस सांताक्रुझ क्र.। चा अंतिम प्लॉट क्र. ६६ किंवा साधारण जवळपास धारण केलेल्या, फिरोज शाह रोड, सांताक्रुझ पश्चिम, मुंबई ४०००५४ येथे स्थित असलेल्या अचरत बाग को-ऑपरेटिव्ह हौसिंग सोसायटी लिमिटेड या संस्थेच्या डी विंग मधील ६ व्या मजल्यावरील सदनिका क्र. ६०३, मोजमाप ८३४ चौ.फू. कार्पेट क्षेत्रफळ आणि समतूल्य ७७.४८ चौ.मी. रेरा कार्पेट क्षेत्रफळ ही सदनिका व त्यासह १ कार पार्किंग जागा आणि सदर इमारतीचे बृमुंमपाद्वारे पारित बांधकाम भोगवटा सह इमारत पूर्तता प्रमाणपत्रानुसार वर्ष २०२४ (दि. २४.०४.२०२४) रोजी पूर्ण झाले आहे.

दिनांकः १९.०६.२०२६
सही/-
(श्री. दिपेश जे. सांचला)
वकील

## E–TENDER NOTICE

MAHATRANSCO
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

MSETCL invites online bids (E-Tender) from reputed & registered Electrical contractors on Mahatransco Website **https://srmetender.mahatransco.in** for the following Tender specification. **Tender fees Rs.500/- + GST**

| Sr. No. | Particulars | Description |
|---|---|---|
| 1 | Tender No. & Name of Tender | **RFx No.: 7000040154** **Tender No.: EE/EHV(O&M)/DN/PNL/e-Tender-24/ 2026-2027.** RFx e-tender for AMC for various regular preventative maintenance / emergency and breakdown works of various 220kV & 100kV Substations under EHV (O&M) Division Panvel. **2nd call.** **Tender amount Limited to Rs. 25,00,000/-, EMD amount Rs. 25,000/-** |
| 2 | Online Downloading the RFx | **18.06.2026, 18:00 Hrs. to 28.06.2026, 23:59 Hrs.** |
| 3 | Online Submission of the RFx | **On or Before 28.06.2026 up to 23:59 Hrs.** |
| 4 | Online Opening of the **Techno Commercial RFx** | **29.06.2026 at 11:00 hrs. (if Possible)** |

For further details visit our website :- **https://srmetender.mahatransco.in**
**Contact Person :-** The Dy. Executive Engineer, (O): Mobile No. 9769894505.
**Note :** All eligible Suppliers / Contractors are mandated to get enrolled on SRM E-Tenders (New) portal of MSETCL.

**Sd/-**
**Executive Engineer**
**E.H.V. (O&M) Dn. Panvel**

# चंदेरी च्वींगम

मुंबई । शुक्रवार
१९ जून, २०२६
नवाकाळ
Email- contact@navakal.in
24x7 : www.navakal.in

## जॅकलीन झळकणार भयपटात



**अभिनेत्री** जॅकलिन फर्नांडिस हिने एका नव्या हॉरर चित्रपटावर स्वाक्षरी केली असून अत्यंत गुप्तता राखत यासंदर्भातील काम वेगाने सुरू करण्यात आले आहे. या नव्या चित्रपटाचे नाव अद्याप गुलदस्त्यात ठेवण्यात आले असले, तरी अधिकृत टीझर आणि एक मुख्य गाणे आधीच चित्रित करण्यात आले आहे. या चित्रपटाचे दिग्दर्शन पवन कृपलानी करत आहेत,तर निर्मिती 'रमेश तौरानी' यांच्या टिप्स फिल्म्स आणि अमर बुटाला यांच्या संयुक्त विद्यमाने केली जात आहे. या प्रकल्पाची घोषणा अधिकृतपणे आणि मोठ्या प्रमाणावर करण्यासाठी निर्मात्यांनी एक विशेष रणनीती आखली आहे. त्यानुसार, चित्रपटाच्या मुख्य चित्रीकरणाला प्रत्यक्ष सुरुवात होण्यापूर्वीच, चित्रपटाचा टीझर आणि एक गाणे मुंबईतील स्टुडिओमध्ये भव्य सेट उभारून चित्रित करण्यात आले आहे. हे गाणे कथानकाचा एक महत्त्वाचा भाग असणार आहे. जॅकलिनने यापूर्वी पवन कृपलानी यांच्या 'भूत पोलिस' या हॉरर-कॉमेडी चित्रपटात काम केले होते, तर टिप्स फिल्म्ससोबत तिने 'रेस २' आणि 'रेस ३' यांसारख्या मोठ्या चित्रपटांमध्ये भूमिका साकारल्या आहेत. या दोन्ही जुन्या सहकाऱ्यांसोबत ती पुन्हा एकदा एका पूर्णतः वेगळ्या भूमिकेत प्रेक्षकांच्या भेटीस येणार आहे.

## 'बंटवारा १९४७'चा टीझर रिलीज



**आमिर खान** प्रॉडक्शन्सच्या वतीने आगामी 'बंटवारा १९४७' या बहुप्रतीक्षित चित्रपटाचा अधिकृत टीझर रिलीज करण्यात आला आहे.

आधी 'लाहोर १९४७' असे शीर्षक असलेल्या या चित्रपटाचे नाव बदलून आता 'बंटवारा १९४७' असे करण्यात आले आहे. या टीझरमध्ये भारत-पाकिस्तान फाळणीच्या काळातील भीषणता, संघर्ष आणि मानवी वेदनांचे चित्रण पाहायला मिळते. चित्रपटात अभिनेता सनी देओल मुख्य भूमिकेत असून तो द्वेष आणि भीतीचा सामना करत माणुसकीसाठी लढताना दिसत आहे. या टीझरला बॉलिवूडचा मिस्टर परफेक्टनिस्ट आमिर खान याने आपला आवाज (नॅरेशन) दिला असून, त्याच्या दमदार आवाजामुळे टीझर अधिक प्रभावी बनला आहे.

या चित्रपटाचे दिग्दर्शन राष्ट्रीय पुरस्कार विजेते दिग्दर्शक राजकुमार संतोषी करत आहेत. या निमित्ताने राजकुमार संतोषी आणि सनी देओल हे दिग्गज तब्बल तीन दशकांनंतर एकत्र आले आहेत. हा चित्रपट सुप्रसिद्ध नाटककार असगर वजाहत यांच्या 'जिस लाहोर नई देख्या, ओ जम्याई नई' या प्रसिद्ध नाटकावर आधारित आहे. यामध्ये सनी देओलसोबत शबाना आझमी, प्रिती झिंटा, अली फझल, अभिमन्यु सिंग आणि सनी देओलचा मुलगा करण देओल अशी तगडी स्टारकास्ट महत्त्वपूर्ण भूमिकेत दिसणार आहे. १४ ऑगस्ट २०२६ रोजी स्वातंत्र्यदिनाच्या आठवड्यात जगभरात हा चित्रपट प्रदर्शित होणार आहे.

## 'द इंडिया स्टोरी'ला कायदेशीर नोटीस





**अभिनेता** श्रेयस तळपदे आणि अभिनेत्री काजल अग्रवाल यांच्या मुख्य भूमिका असलेल्या 'द इंडिया स्टोरी: स्लो पॉयझन इन प्रोग्रेस'या आगामी चित्रपटाला कायदेशीर नोटीस बजावण्यात आली आहे. या चित्रपटाच्या टीझर आणि प्रसिद्धी साहित्यामध्ये भारतीय शेती, दुग्धव्यवसाय आणि कुक्कुटपालन क्षेत्राविषयी दिशाभूल करणारे आणि वैज्ञानिक आधार नसलेले दावे केल्याचा आरोप या नोटीसमध्ये करण्यात आला आहे.

या नोटीसमध्ये आक्षेप घेण्यात आला आहे की, चित्रपटात कीटकनाशकांचा अतिवापर, खाद्यपदार्थांमधील भेसळ आणि कर्करोगाची आकडेवारी अतिशयोक्तीपूर्ण दाखवण्यात आली आहे. भारताची संपूर्ण कृषी व्यवस्था ही जणू काही स्लो पॉयझन' आहे, अशा पद्धतीने ती मांडल्याचा आरोप यात केला आहे. अशा चित्रणामुळे देशातील कोट्यवधी शेतकरी, दुग्ध उत्पादक, पोल्ट्री व्यावसायिक आणि कृषी निविष्ठा पुरवठादारांच्या प्रतिमेला नाहक तडा जात असून, सर्वसामान्यांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण होत असल्याचे तक्रारदाराचे म्हणणे आहे.

## गुगल, मेटाविरुद्ध प्रीतीची लढाई



**बॉलीवूड** अभिनेत्री प्रिती झिंटा हिने तिच्या नावाचा आणि प्रतिमेचा गैरवापर करून तयार करण्यात आलेल्या कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय) आधारित डीपफेक आणि छेडछाड केलेल्या डिजिटल मजकुराविरोधात कायदेशीर पाऊल उचलले आहे. या प्रकरणी मुंबई उच्च न्यायालयाने प्रिती झिंटा हिला गुगल आणि मेटा यांसारख्या तंत्रज्ञान क्षेत्रातील आघाडीच्या कंपन्यांसह इतर काही संकेतस्थळांविरोधात दिवाणी खटला दाखल करण्याची परवानगी दिली आहे.

प्रिती झिंटा हिच्या वतीने न्यायालयात सादर करण्यात आलेल्या याचिकेत असा आरोप करण्यात आला आहे की, विविध ऑनलाईन प्लॅटफॉर्म्स आणि संकेतस्थळांवर तिची कोणतीही परवानगी न घेता डीपफेक व्हिडिओ, छेडछाड केलेली छायाचित्रे, मिम्स आणि एआय-जनरेटेड चॅटबॉट व्यक्तिमत्त्वे तयार करून ती प्रसारित केली जात आहेत. यामुळे तिच्या पर्सनॅलिटी राईटस्, कॉपीराईटचे आणि व्यावसायिक प्रतिष्ठेचे मोठे नुकसान होत आहे.

या प्रकरणातील काही प्रतिवादी आणि ऑनलाइन क्रियाकलाप मुंबईच्या भौगोलिक कार्यक्षेत्राबाहेरचे असले, तरी या डिजिटल मजकुराचा जागतिक स्तरावर व्यापक परिणाम होत असल्याने प्रिती झिंटाने मुंबई उच्च न्यायालयात दाद मागितली होती. न्यायालयाने तिची ही विनंती मान्य करत तिला खटला पुढे नेण्याची परवानगी दिली आहे.

## दया नायकवर बायोपिक येणार?



**सुप्रसिद्ध** चित्रपट दिग्दर्शक राम गोपाल वर्मा हे मुंबईच्या गुन्हेगारी विश्वाच्या पार्श्वभूमीवर आधारित आणखी एक नवा चित्रपट आणण्याच्या तयारीत आहेत. हा चित्रपट बायोपिक स्वरुपाचा असण्याची शक्यता आहे. यासाठी मुंबई पोलीस दलाचे एन्काउंटर स्पेशलिस्ट दया नायक यांच्या जीवनकहाणीचा आधार घेण्यात आल्याचे समजते. सध्या याच्या पटकथेवर (स्क्रीनप्ले) काम सुरू आहे. चित्रपटाला एका मोठ्या स्टुडिओची साथ लाभण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

राम गोपाल वर्मा यांच्या २००२ मधील 'कंपनी' या सिनेमॅटिक युनिव्हर्सशी हा नवा बायोपिक जोडला जाण्याची शक्यता आहे. सध्या राम गोपाल वर्मा हे चित्रपटसृष्टीत जोमाने पुनरागमन करत असून, त्यांचे इतरही काही महत्त्वाकांक्षी प्रकल्प रांगेत आहेत. 'सिंडिकेट' या क्राईम थ्रिलर चित्रपटाह अमिताभ बच्चन आणि अभिषेक बच्चन यांच्या मुख्य भूमिका असलेल्या 'सरकार ४' या राजकीय क्राईम ड्रामा चित्रपटाची अधिकृत घोषणाही केली आहे.

## फरहान-सलमान एकत्र झळकणार?





**बॉलीवूड** सुपरस्टार सलमान खान आणि अष्टपैलू चित्रपट निर्माते फरहान अख्तर यांच्यात एका अत्यंत भव्य आणि ऐतिहासिक पार्श्वभूमी असलेल्या चित्रपटाबाबत चर्चा सुरू असल्याचे वृत्त समोर आले आहे. हा प्रकल्प दोन भागांमध्ये तयार केला जाणार असून तो अत्यंत मोठ्या प्रमाणावर पडद्यावर आणण्याची योजना आहे. यावर शिक्कामोर्तब झाले, तर बॉलीवूडमधील ही एक सर्वात मोठी आणि बहुप्रतीक्षित भागीदारी ठरेल. फरहान अख्तरने यापूर्वी आमिर खानसोबत 'दिल चाहता है' आणि शाहरुख खानसोबत 'डॉन' आणि 'डॉन २' या चित्रपटांचे दिग्दर्शन केले आहे. त्यामुळे सलमान खानसोबतचा हा चित्रपट यशस्वी ठरल्यास फरहानच्या नावावर तिन्ही खानांसोबत काम करण्याचा दुर्मीळ विक्रम नोंदवला जाईल.

## ठाणे कारागृहातील हल्लाप्रकरण कैद्याची निर्दोष मुक्तता केली

■ ठाणे

२०१७ मध्ये ठाणे मध्यवर्ती कारागृहातील कारागृह अधिकाऱ्यांवर हल्ला केल्याच्या आरोपाखालील सुरू असलेल्या खटल्यात एका कैद्याची ठाणे सत्र न्यायालयाने निर्दोष मुक्तता केली. कारागृह प्रशासनाच्या गंभीर त्रुटींमुळे सरकारी पक्षाच्या दाव्यांबाबत मोठा संशय निर्माण झाल्याचे न्यायालयाने नमूद केले.

अतिरिक्त सत्र न्यायाधीश जी. टी. पवार यांनी अरमान नफीस खान याच्यावरील पोलीस अधिकाऱ्यांवर हल्ला करणे आणि धमकी देणे या आरोपांतून त्याची मुक्तता केली. आरोप सिद्ध करण्यात सरकारी पक्ष अपयशी ठरल्याचे न्यायालयाने म्हटले. सरकारी पक्षाच्या म्हणण्यानुसार, २ मार्च २०१७ रोजी कारागृहातील उच्च सुरक्षा बराकीत ठेवण्यात आलेल्या खानने अन्नवाटप सुरू असताना कारागृह अधिकारी संभाजी पिसे यांच्यावर धारदार धातूच्या पट्टीने हल्ला केला होता. या हल्ल्यात पिसे यांच्या मानेजवळ दुखापत झाली होती. हस्तक्षेप करणाऱ्या आणखी दोन कर्मचाऱ्यांवरही हल्ला करून त्यांना धमकावल्याचा आरोप होता.

## सुभाष चंद्रा यांचा लुटियन्स दिल्लीतील बंगला तब्बल १,२६० कोटी रुपयांना विकला

■ नवी दिल्ली

**एसेल** समूहाचे अध्यक्ष सुभाष चंद्रा यांनी लुटियन्स दिल्लीतील आपला आलिशान बंगला तब्बल १,२६० कोटी रुपयांना विकल्याची माहिती सूत्रांनी दिली आहे. अलीकडील काळातील हा सर्वात महागड्या मालमत्ता व्यवहारांपैकी एक मानला जात आहे.

भगवान दास रोडवरील सुमारे तीन एकर क्षेत्रफळाचा हा बंगला लुटियन्स दिल्ली परिसरात असून तो कनॉट प्लेस आणि इंडिया गेट यांच्या जवळ आहे. हा बंगला दिल्लीतील एका व्यावसायिक कुटुंबाने खरेदी केल्याचे सांगितले जात असले तरी खरेदीदाराची ओळख जाहीर करण्यात आलेली नाही.

याच रस्त्यावर असलेली आणखी एक मालमत्ता गौतम अदानी यांच्या समूहाने २०२० मध्ये सुमारे ४०० कोटी रुपयांना खरेदी केली होती. सूत्रांच्या माहितीनुसार, १,२६० कोटी रुपयांचा हा व्यवहार डिसेंबरच्या पहिल्या आठवड्यापर्यंत पूर्ण होण्याची शक्यता आहे. सुभाष चंद्रा यांनी हा बंगला २०१५ मध्ये ३०४ कोटी रुपयांना विकत घेतला होता. त्यामुळे गेल्या दशकात या मालमत्तेच्या किमतीत चारपटपेक्षा अधिक वाढ झाली आहे. लुटियन्स बंगला झोन हा देशातील सर्वाधिक महागड्या रिअल इस्टेट परिसरांपैकी एक मानला जातो.

## फ्युचर ब्रँड्सविरुद्ध दिवाळखोरी प्रक्रिया सुरू एनसीएलटीने युनियन बँकेची याचिका मंजूर केली

■ नवी दिल्ली


**किशोर** बियाणी यांच्या फ्युचर समूहातील फ्युचर ब्रँड्स लिमिटेडविरुद्ध दिवाळखोरी प्रक्रिया सुरू करण्यास मुंबई येथील एनसीएलटी म्हणजेच राष्ट्रीय कंपनी कायदा न्यायाधिकरणाने मंजुरी दिली आहे. युनियन बँक ऑफ इंडियाने दाखल केलेली याचिका न्यायाधिकरणाने स्वीकारली.

युनियन बँकेने फ्युचर ब्रँड्सकडून सुमारे ११४ कोटी रुपयांची थकबाकी असल्याचा दावा केला होता. त्यानंतर न्यायाधिकरणाने कनक जानी यांची 'अंतरिम रिझोल्यूशन प्रोफेशनल' म्हणून नियुक्ती केली आहे. त्यांच्यावर दिवाळखोरी आणि दिवाळखोरी संहिता २०१६ अंतर्गत पुढील प्रक्रिया पार पाडण्याची जबाबदारी सोपवण्यात आली आहे. तसेच, न्यायाधिकरणाने कंपनीविरुद्ध कलम १४ अंतर्गत स्थगन आदेश (मोरॅटोरियम) लागू करण्याचे निर्देश दिले आहेत.फ्युचर ब्रँड्सने काही ब्रँड्सच्या अधिग्रहणासाठी, ब्रँड विकासासाठी तसेच मुद्रित आणि बाह्य जाहिरातींसाठी आगाऊ रक्कम व अनामत भरण्यासाठी युनियन बँक ऑफ इंडियाकडे मुदत कर्जाची मागणी केली होती. कंपनीची एकूण कर्जाची गरज ५४० कोटी रुपये असल्याचे नमूद करण्यात आले होते.

## तांत्रिक कारणावरुन भरपाई नाकारता येणार नाही रस्ते अपघात प्रकरणी हायकोर्टाचा निर्वाळा

■ मुंबई

**मोटार** वाहन कायदा हा अपघातग्रस्तांना आणि त्यांच्या कुटुंबियांना दिलासा दिला आहे. केवळ गेल्या तीन वर्षांचे 'इन्कम टॅक्स रिटर्न' उपलब्ध नाही. या तांत्रिक कारणावरुन मृताच्या कुटुंबियांना मिळणारी नुकसानभरपाई नाकारता किंवा कमी करता येणार नाही, असा महत्त्वपूर्ण निर्वाळा उच्च न्यायालयाने एका प्रकरणात दिला आणि नाशिकच्या मोटार अपघात दावा लवादाने दिलेला ७७.२७ लाखांच्या नुकसानभरपाईचा निर्णय योग्य ठरवला.



२१ जुलै २०२१ रोजी हुजेफा एजाज अंजुम उस्मानी हे स्कोडा कारने मुंबईहून नाशिकला जात होते. मुंबई-आग्रा महामार्गावरील वाडीवऱ्हे शिवाराजवळ ट्रकने त्यांच्या कारला जोरात धडक दिली. या अपघातात हुजेफा यांचा मृत्यू झाला. हुजेफा यांच्या पश्चात त्यांची पत्नी, अल्पवयीन मुलगी आणि वृद्ध आई-वडील असा परिवार आहे. त्यांच्या कुटुंबीयांनी नाशिक लवादाकडे नुकसानभरपाईसाठी दावा दाखल केला होता. लवादाने कुटुंबियांना ७७.२७ लाख रुपयांची नुकसानभरपाई मंजूर केली होती. त्याविरोधात नॅशनल इन्शुरन्स कंपनी लिमिटेडने अपील दाखल केले होते. ते अपिल न्यायमूर्ती आरती साठे यांनी अपील फेटाळले आणि नाशिकच्या मोटार अपघात दावा लवादाचा भरपाईचा निर्णय योग्य ठरवला. नाशिक लवादाने हुजेफा यांच्या आर्थिक उत्पन्नाचा आधार म्हणून २०१८-१९ चा आयटीआर ग्राह्य धरून ७७,२७,८६४ रुपये ६ टक्के व्याजासह मंजूर केले होते.

## मराठवाड्यात २१ जूनला देशपातळीवरील हिंदकेसरी बैलगाडा शर्यतीचे आयोजन

■ छत्रपती संभाजीनगर

**मराठवाड्यातील** बैलगाडा शर्यतप्रेमींसाठी एक ऐतिहासिक क्षण ठरणाऱ्या देशपातळीवरील 'हिंदकेसरी बैलगाडा शर्यती'चे आयोजन २१ जून रोजी छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील शरणापूर येथे करण्यात आले आहे. भांगशी माता गडाच्या पायथ्याशी उभारलेल्या 'हिंदकेसरी मैदानावर' सकाळी ७ वाजल्यापासून या स्पर्धेचा थरार रंगणार असून, मराठवाडा, विदर्भ, खान्देश आणि उत्तर महाराष्ट्रातील बैलगाडा शौकिनांच्या पुढाकारातून साकारलेल्या या स्पर्धेमुळे शरणापूर हे राष्ट्रीय स्तरावरील बैलगाडा शर्यतीचे नवे केंद्र ठरणार आहे. बैलगाडा शर्यतींचा उल्लेख झाला की पश्चिम महाराष्ट्र, पुणे जिल्ह्यातील आंबेगाव घाट किंवा मुंबई परिसरातील बिनजोड शर्यतींची परंपरा डोळ्यासमोर उभी राहते. मात्र, काही महिन्यांपूर्वी नाशिक येथे झालेल्या वादानंतर पश्चिम महाराष्ट्रातील काही बैलगाडा संघटनांनी स्पर्धा केवळ त्यांच्या विभागापुरत्या मर्यादित ठेवण्याची भूमिका घेतली होती.

## कोरेगावच्या शिवनेरी शुगर्सला वादळी पावसाचा मोठा फटका

### ७४ हजार क्विंटल साखर भिजली

■ कोरेगाव

**तालुक्यातील** जयपूर येथील शिवनेरी शुगर्स प्रायव्हेट लिमिटेड या साखर कारखान्याला मागील आठवड्यात झालेल्या वादळी पावसाचा मोठा फटका बसला. वादळी वाऱ्यामुळे साखर साठवणूक गोदामाचे छत उडाल्याने सुमारे ७४ हजार क्विंटल साखर भिजून खराब झाली असून, प्राथमिक अंदाजानुसार सुमारे ७ कोटी ५० लाख रुपयांचे नुकसान झाले आहे.

गेल्यावर्षी डिसेंबर महिन्यात शॉर्टसर्किटमुळे लागलेल्या आगीत स्टोअर गोडाऊनमधील ५ कोटी रुपयांचे साहित्य जळून खाक झाले होते. अवघ्या सात महिन्यांतच पुन्हा मोठे नुकसान झाले आहे.जयपूर परिसरात सायंकाळी वादळी वाऱ्यासह मुसळधार पाऊस झाला.या नैसर्गिक आपत्तीमुळे कारखान्याच्या साखर गोदामावरील संरक्षक शेड आणि छत उडून गेले.त्यामुळे पावसाचे पाणी थेट गोदामात शिरले आणि साठवलेली कोट्यवधी रुपयांची साखर भिजली. तसेच छताचेही मोठे नुकसान झाले. या घटनेची माहिती मिळाल्यानंतर परिसरातील ऊस उत्पादक शेतकरी आणि वाहतूकदारांमध्ये काही काळ चिंता पसरली होती.मात्र, परिस्थिती नियंत्रणात असून, अफवांवर विश्वास ठेवू नये, असे आवाहन व्यवस्थापनाकडून करण्यात आले आहे.

## मुंबईत पुन्हा मराठी भाषेचा अवमान रेल्वे कर्मचाऱ्याचा व्हिडिओ व्हायरल

■ मुंबई

**मुंबई** सेन्ट्रल रेल्वे स्थानकावर प्रवाशाशी संवाद साधताना एका कर्मचाऱ्याने मराठीत बोलण्यास नकार दिल्याचा आरोप करणारा व्हिडिओ व्हायरल झाला. यानंतर मराठी एकीकरण समितीने आक्रमक भूमिका घेत संबंधित कर्मचाऱ्याच्या निलंबनाची मागणी केली. कारवाई न झाल्यास रेल्वेच्या विभागीय कार्यालयात ठिय्या आंदोलन करण्याचा इशाराही समितीने दिला.

व्हिडिओमध्ये रेल्वे कर्मचाऱ्याला प्रवाशाने ट्रेनबाबत माहिती विचारल्यानंतर तो कर्मचारी मला ट्रेनबद्दल माहिती नाही, चौकशी विभाग दुसरीकडे आहे. मी मराठीत बोलणार नाही, तू इथून निघ. असे हिंदीत सांगताना दिसतो. हा व्हिडिओ एक्सवर पोस्ट करत मराठी एकीकरण समितीने म्हटले आहे की, संबंधित कर्मचाऱ्यावर कारवाई करून त्याचे निलंबन करावे. या कर्मचाऱ्याचे निलंबन झाले नाही तर विभागीय रेल्वे कार्यालयात ठिय्या आंदोलन करण्यात येईल. मराठीचा अवमान सहन केला जाणार नाही. त्यामुळे त्याच्यावर भाषिक अवमानाबद्दल अॅट्रोसिटी गुन्हा नोंदवावा. परप्रांतीय पुन्हा पुन्हा म्हणतात की मराठी माणसे मारहाण करतात. त्यांना हा माज दिसत नाही?

## मुलांच्या घरपोच आहारात नव्या पाककृतींचा समावेश

### मंत्री आदिती तटकरेंची माहिती

■ मुंबई

**अंगणवाडीतील** बालकांसह गरोदर महिला, स्तनदा माता आणि आकांक्षित जिल्ह्यांतील किशोरवयीन मुलींना देण्यात येणाऱ्या घरपोच आहारात पोषणमूल्यांसोबतच चवीलाही प्राधान्य देऊन नवीन आणि रुचकर पाककृतींचा समावेश करण्यात आला असल्याची माहिती महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे यांनी दिली.

घरपोच आहारासंदर्भात मंत्रालयात आढावा बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी मंत्री तटकरे यांनी आहाराचा



आस्वाद घेऊन त्याच्या गुणवत्तेची पाहणी केली. या बैठकीस महिला व बालविकास विभागाचे सचिव डॉ. अनुपकुमार यादव, आयुक्त माधवी सरदेशमुख, आयुक्त डॉ. जगदीश मणियार (दूरदृश्य प्रणालीद्वारे), सहसचिव वी. आर. ठाकूर, अवर सचिव सुनील सरदार, प्रसाद कुलकर्णी, सहआयुक्त वर्षा पवार, उपायुक्त संगीता लोंढे, विजय क्षीरसागर, जामसिंग गिरासे यांच्यासह संबंधित अधिकारी उपस्थित होते. आदिती तटकरे म्हणाल्या की, सध्याच्या 'एनर्जी डेन्स मूग डाळ खिचडी प्रीमिक्स'मधील घटकांच्या मिश्रणात सुधारणा करण्यात आली. आहाराचा दर्जा अधिक चांगला राखण्यासाठी मसाल्याचे पाकीट स्वतंत्रपणे उपलब्ध करून देण्यात येणार आहे. याशिवाय 'मल्टी मिक्स सीरियल्स अँड प्रोटीन्स' ही पाककृती कायम ठेवण्यात आली आहे. तसेच 'व्हेज पुलाव' आणि 'मल्टीग्रेन पफ' या दोन नवीन पाककृतींचा समावेश करण्यात आला आहे.


## बेकायदा फेरीवाल्यांविरोधात तक्रार आता व्हॉट्सअॅपवर!

■ मुंबई

**मुंबई** उच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार,आता मुंबई महापालिकेने शहरातील अनधिकृत फेरीवाल्यांविरोधात तक्रार नोंदवण्यासाठी आपल्या व्हॉट्सअॅप चॅटबॉटवर स्वतंत्र पर्याय उपलब्ध करून दिला आहे.या माध्यमातुन नागरिकांना ८९९९-२२-८९९९ या व्हॉट्सअॅप क्रमांकावर मेसेज पाठवून तक्रार दाखल करता येईल, अशी माहिती पालिका अधिकाऱ्यांनी दिली.

नागरिकांच्या तक्रारींचे विविध विभागांमध्ये प्रभावी व्यवस्थापन आणि निवारण करण्याच्या उद्देशाने पालिकेने नुकतेच 'मायबीएमसी मार्ग' हे तक्रार निवारण प सुरू केले आहे. त्यानंतर अनधिकृत फेरीवाल्यांची तक्रार आता व्हॉट्सअॅपवर करण्याची नवी सुविधा सुरू केली आहे. यापूर्वीही नागरिक १९१६ हेल्पलाइन, सोशल मीडिया माध्यमे आणि व्हॉट्सअॅप चॅटबॉटचा वापर करून रस्त्यांवरील खड्डे तसेच इतर नागरी समस्यांबाबत तक्रारी नोंदवत होते.मात्र,उच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार नव्याने सुरू करण्यात आलेली ही सुविधा विशेषतः अनधिकृत फेरीवाल्यांविरोधातील तक्रारींसाठी उपलब्ध करण्यात आली आहे.

# नवाकाळ शब्दकोडे-१६४१



**आडवे शब्द –**

२. पाण्याचा कालवा ४. व्यभिचारी ७. आसनस्थ ११. अतिशय वेगाने आणि आक्रमकपणे वाढणारी बाभळीची एक जात १२. सरस्वतीचे वाद्य १३. अभिप्राय १४. कारस्थान १५. गरीब स्वभावाचा, सज्जन १६. बालंट १७. स्त्री १८. शीण, दमणूक १९. सामान्य २०. पाण्याचा पाईप २१. राजाप्रमाणे देखणा, रुबाबदार २३. भुंगा २५. रागाची सणक २७. गाढव २९. उपवासाचा भात ३१. क्रीडा ३२. सुपारीची एक जात ३४. यज्ञात अग्नीला अर्पिलेला नैवेद्य ३५. भीमाने मारलेला राक्षस ३७. प्रत्येक दिवशी ३८. चोळीचे कापड ३९. रानटी ४०. वृद्धी, विकास ४१. पुरुष ४२. हनुमानाचे शस्त्र ४३. बेसावध ४४. वेगवान, भरधाव ४६. धूम्रपानासाठी वळलेली कांडी ४७. लग्न न झालेला ४८. धैर्य ४९. मुलाची वा मुलीची मुलगी ५१. सैल कपडे ५३. बगळा ५४. पिच्छा, पाठपुरावा ५५. गाणारा, गवई ५७. हेकट ६१. चौसष्ट पारंपरिक कौशल्ये ६२. मनातील गोष्ट ओळखणारा ६४. निवडणुकीच्या काळात सर्वांवर बंधनकारक असलेले नियम ६७. डोक्यावरच्या ओझ्याखाली ठेवलेली कापडाची गुंडाळी ६८. लाकडी पळी ६९. विश्वास, खात्री ७०. ढग, मुलांचे एक नाव ७२. ठाम, भक्कम ७३. रोटी, भाकरीचे सोनेरी धान्य ७४. दोन बैल जुंपलेली आणि वर छत असलेली गाडी ७६. भ्रमरी, लक्ष्मी ७७. खुंटी ७८. विनंती ८०. मोठ्या आकाराची खोलगट पितळी ८२. भगवान शंकर ८५. कूर्म, कच्छप ८६. उन्नती, विकास ८८. बिनधास्त ९१. मुंडण ९२. धूप दाखवणे ९३. अरण्य ९४. नमस्कार ९५. पार्वती ९७. खुशाली, समाचार ९९. शांत, स्तब्ध १०१. मृग १०२. टंगळमंगळ १०३. मगर १०४. पराक्रमी

**उभे शब्द –**

१. वडिलांच्या वयाचा, ज्येष्ठ २. पूर्वी झाले नाही आणि नंतर होणार नाही असे विलक्षण ३. खंत, खेद ४. ब्रीद, खाक्या ५. शकुन बघण्याची विद्या ६. कीर्तिमान ७. विटेचा तुकडा ८. ज्याप्रमाणे ९. ज्वारीची लोकप्रिय जात १०. शीर १२. अनासक्त, विरक्त १४. केरळचे नृत्य १७. रोगप्रतिबंधक इंजेक्शन २२. दहशत २४. नीहार २५. तीन रस्ते मिळतात ती जागा २६. अवघड, बिकट २८. बरोबर २९. देव ३०. राक्षस ३२. पोटापाण्याचे काम, नोकरी ३३. दरवाढ, महागाई ३६. कर्नाटकची भाषा ३८. कथेतील दुष्ट पुरुष पात्र ४२. वेढा ४४. मासेमारीचा हूक ४५. वस्त्र विणण्याचे साधन ४६. अधू, असमर्थ ४७. कावळा ४८. निर्भीड ५०. निकृष्ट, कंडम ५२. उंच इमारतीचे विशेषण ५३. मोठेपणाचा तोरा ५४. लुब्ध, अनुरक्त ५६. निकट ५८. सत्यांश ५९. ऐना, दर्पण ६०. भावाची बायको ६३. थडगे ६४. वृक्ष, बाग, अरण्य ६५. वात्रट ६६. संकटातून तारणारा ६८. दरोडा ६९. सत्तावीसपैकी दुसरे नक्षत्र ७१. लांब पल्ल्याची तलवार ७२. नवरात्रात येणारा शस्त्रपूजेचा दिवस ७३. यज्ञ ७४. प्रामाणिक ७५. काकडी ७७. टेबल ७८. विसराळू ७९. नवी पालवी, तारुण्याचा बहर ८०. नवरा ८१. घोडे बांधण्याची जागा ८३. छत ८४. भयभीत, व्याकूळ ८५. फणसाची एक जात ८६. लबाडी, फसवणूक ८७. गुजराती नृत्य ८९. रक्तवाहिनी ९०. प्रेत ९२. शेकोटी ९३. धातूची सळई ९६. रंग ९७. डिंकाचा घरगुती पर्याय ९८. काळोख १००. ताक घुसळण्याचे साधन •

**नवाकाळ कोडे क्रमांक १६४० चे उत्तर**

**आडवे शब्द** : १. असहाय ४. जागृत ६. मोहक ९. मुरब्बी १२. श्राव्य १३. दादर १५. थारा १७. तपासनीस १८. प्राण १९. पसार २१. गुपित २२. भाट २३. ममता २५. चीज २६. वामांगी २९. ललकारी ३२. नीरवता ३५. हलवाई ३७. दाम ३९. चणे ४०. प्रवाद ४२. धड ४३. कंचुकी ४५. ललना ४७. मजा ४८. लक्ष्य ४९. कुचराई ५१. कार ५२. कामला ५३. स्वामी ५४. साद ५५. आळा ५६. श्वशुर ५८. पलटवार ६०. गोगलगाय ६२. वितरक ६५. पारवा ६६. वतनदार ६७. शुश्रुषा ६८. उभा दावा ७०. सनद ७२. नाका ७३. प्रभात ७५. यादी ७७. ताक ७८. हटके ८०. अंगरक्षक ८२. पहार ८४. पाक ८५. समा ८७. जन्मजात ८९. सम ९०. संकट ९१. कोय ९२. परीस ९३. चरक ९५. ताकद ९७. कदर ९९. अक्ष १००. गवा १०१. पाळत १०३. लालसा १०५. रडारड १०७. पावा १०८. वाटसरू १०९. मीमांसा ११०. हात १११. वई ११२. नाचणी ११३. हतबल ११४. लगट ११५. छटाक

**उभे शब्द** : १. अश्राप २. सव्यसाची ३. यदा ४. जार ५. तथापि ७. हतभागी ८. कपाट ९. मुनीम १०. रसमलई ११. गुणकारी १४. दरडावणे १६. रातवा २०. रजनी २१. गुद्दा २४. ताल २७. मांजा २८. हल ३०. कामचुकार ३१. धंदा ३३. रचना ३४. मेवा ३५. हडकुळा ३६. वाफारा ३८. मलमल ४०. प्रजा ४१. दलदल ४४. कीर ४६. ललाट ४७. ममी ५०. ईश्वर ५२. कापड ५३. स्वार ५४. सागवान ५५. आयतन ५७. शुकशुकाट ५९. वायदा ६०. गोरस ६१. गाव ६२. विदारक ६३. तर ६४. विषाद ६८. उभा जन्म ६९. भात ७१. दया ७२. नाहक ७४. सरस ७६. दीपक ७७. तार ७९. केसरी ८०. अंतरपाट ८१. क्षमता ८३. हाटक ८४. पाय ८६. मासलेवाईक ८७. जनगणना ८८. जाच ९०. संदल ९१. कोरडा ९२. पक्ष ९४. कळस ९६. कलागत ९८. दरसाल ९९. अडत १०२. तरू १०४. सामील १०६. रहाट १०७. पावटा १०८. वाणी

# मुंबईत शिवरायांच्या जिरेटोपावरच जैनांनी झेंडा लावला! संताप उसळला

पान १ वरून- मारल्यामुळे वाद सुरु आहे. अशात मालाड पूर्व येथील चौकात असलेल्या छत्रपती शिवाजी महाराजांच्या जिरेटोपाच्या शिल्पावर एक जैन व्यक्ती चढला आणि त्याने जिरेटोपावर जैन धर्माचा पांढरा झेंडा लावला. या घटनेची माहिती मिळताच मनसेचे विभागाध्यक्ष महेश फरकासे कार्यकर्त्यांसह घटनास्थळी पोहोचले. झेंडा लावणाऱ्या जैन व्यक्तीला त्यांनी जाब विचारला की, छत्रपती शिवाजी महाराज हे महाराष्ट्राचे आराध्य दैवत आहेत. त्यांच्या जिरेटोपावर झेंडा लावण्याचा अधिकार तुम्हाला कोणी दिला? यावर त्या जैनाने जिरेटोप आणि शिवाजी महाराज यांच्याबद्दल माहिती नसल्याची म्हणत आपल्याकडून चूक झाली हे मान्य करत त्याबद्दल माफी मागितली. त्यानंतर मनसैनिकांनी त्याला पुन्हा अशी घटना घडू नये याबाबत इशारा दिला आणि झेंडा काढायला सांगितले. तिथेच जैन बांधवांच्या कार्यक्रमाचे पोस्टर लावलेले होते, तेही त्याला काढायला लावले. मनसैनिकांनी 'छत्रपती शिवाजी महाराज की जय आणि जय भवानी, जय शिवाजी' अशा घोषणा दिल्या.

या घडामोडीनंतर मनसैनिकांनी जिरेटोपाच्या शिल्पाला दुग्धाभिषेक घातला. हे सर्व घडले त्याबरोबर सायन परिसरात प्रीमियम शाळेसमोर असलेल्या चिमण निवास इमारतीच्या प्रवेशद्वाराजवळ आज पांढऱ्या पक्ष्या मारण्यात आलेल्या आढळल्या. त्यामुळे या प्रकारांविरूध्द संताप वाढत चालला आहे. याबाबत सरकार आणि पालिकेने तत्काळ निर्णय घेणे आवश्यक आहे.

# शेअर बाजारात 'सात्त्विक' प्रवेश! निवडक उद्योगांचा नवा निर्देशांक

पान १ वरून- योग्य असा पर्याय उपलब्ध करून देणारा सात्त्विक-१०० हा देशातील पहिला निर्देशांक आहे, असा दावा बीएसईच्या वतीने याप्रसंगी करण्यात आला. बीएसई-५०० युनिव्हर्स या निर्देशांकात समाविष्ट असलेल्या कंपन्यांमधून सात्त्विक-१०० कंपन्यांची निवड करण्यात आली आहे आणि पुढे निर्देशांकातील कंपन्यांची फेररचना करतानाही अशीच कंपन्यांची निवड करण्यात येईल, असे बीएसईचे सांगणे आहे. परंतु प्रत्यक्षात या सात्विक -१०० निर्देशांकात पहिले नाव एचडीएफसी बँकेचे आहे. निर्देशांकात एचडीएफसीचे योगदान सर्वाधिक ९.७१ टक्के आहे. सात्विक - १०० मधील अन्य कंपन्यांमध्ये आयसीआयसीआय बँक (७.६९ टक्के), रिलायन्स इंडस्ट्रीज (७.६५ टक्के), भारती एअरटेल, लार्सन अँड टुब्रो, इन्फोसिस, स्टेट बँक ऑफ इंडिया, ॲक्सिस बँक, कोटक महिंद्रा बँक आणि महिंद्रा अँड महिंद्रा आदि कंपन्यांची नावे आहेत. शेअर बाजारात खरेदी-विक्री होऊ शकते असे फंड (ईटीएफ), निर्देशांकांवर आधारित फंड (इंडेक्स फंड), मुच्युअल फंड आदिंसाठी सात्विक-१०० हे एक नवीन व्यासपीठ ठरेल, अशी अपेक्षा बीएसईचे व्यवस्थापकीय संचालक आणि मुख्य कार्यकारी अधिकारी आशुतोष सिंह यांनी व्यक्त केली.

## युध्द समाप्तीच्या करारावर इराण-अमेरिकेची स्वाक्षरी

पान १ वरून- आता कराराच्या अंमलबजावणीवर काटेकोरपणे लक्ष देणे आवश्यक ठरेल, अशी प्रतिक्रिया दिली. या करारानुसार इराण-अमेरिका युध्द संपेल.तसेच लेबनॉनमधील संघर्षही समाप्त होणे अपेक्षित आहे. होर्मुझ सामुद्रधुनी इराण मोकळी करेल आणि अमेरिका होर्मुजवरील नाकाबंदी उठवेल. या शांतता करारावर १९ जून रोजी जिनिव्हाजवळील लुसर्न शहरात स्वाक्षऱ्या होणार होत्या.परंतु निर्धारित कार्यक्रमानंतर एक दिवस आधीच फ्रान्समध्ये करारावर स्वाक्षऱ्या करण्यात आल्या. महात्वाची बाब म्हणजे इराणच्या संसदेचे अध्यक्ष मोहम्मद बाकर गालिबाफ यांनी सांगितले की, करारानुसार सुरुवातीचे ६० दिवस होर्मुझमधून जाणाऱ्या जहाजांवर कर आकारला जाणार नाही.मात्र त्यानंतर तेथे पुरवल्या जाणाऱ्या सेवांवर आम्ही कर आकारणे स्वाभाविक आहे.याचा अर्थ होर्मुझ फक्त दोन महिने टोलमुक्त असणार आहे.


**महानिर्मिती**
महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी मर्यादित

**निविदा सूचना क्रमांक : सीपीए – १४ – २०२६**

खालील बाबींच्या पुरवठ्यासाठी दुहेरी लिफाफा पद्धतीद्वारा इलेक्ट्रॉनिक निविदा मागविण्यात येत आहेत.

| निविदा क्रमांक | निविदा विवरण | निविदा विक्रीचा कालावधी |
|---|---|---|
| ३००००६९८१४ | महानिर्मिती कंपनीच्या विविध औष्णिक विद्युत केंद्रांकरिता हायड्राझीन हायड्रेट खरेदी करणेबाबत. | ०७/०७/२०२६ – ११.०० वाजे पर्यंत |

संपर्क तपशील: मुख्य अभियंता (म.ख.वि.) यांचे कार्यालय, दूरध्वनी क्र : ०२२-६९८५ ३६१७ / ३६१८

अधिक तपशिलाकरिता https://eprocurement.mahagenco.in/ या वेबसाईटला भेट द्या.

**मुख्य अभियंता (म.ख.वि.)**



## PUBLIC NOTICE

Notice is hereby given that RBK Share Broking Ltd., having its registered office at 1/A, Alli Chambers, Medows Street, Fort, Mumbai – 400001, and functioning as a Depository Participant with DP ID: 24500, holding SEBI Registration No. IN-DP-253-2016, has initiated the process of surrendering its Depository Participant registration with the Securities and Exchange Board of India (SEBI).

The Company has commenced the assignment/transfer of its Depository Participant business and client accounts in accordance with the applicable regulations, guidelines, and approvals of the concerned authorities.

Upon successful completion of the assignment/transfer process and fulfillment of all regulatory requirements, RBK Share Broking Ltd. shall surrender its SEBI Registration Certificate bearing Registration No. IN-DP-253-2016.

Clients, stakeholders, and members of the public may contact the Company at its registered office for any clarification or information relating to this matter.

Place: Mumbai
Date: 19th June 2026

Sd/-
**Anil Gupta**
**Authorised Signatory**
**RBK Share Broking Ltd.**



## जाहीर सूचना

(नादारी आणि दिवाळखोरी संकेत, २०१६ च्या कलम १०२ अन्वये)
**मैना इंडस्ट्रीज लिमिटेडच्या वैयक्तिक जामीनदार**
**कु. सरिता बूरुगू (उर्फ कु. सरिता ग्रांधी) यांच्या धनकोंचे लक्ष वेधण्याकरिता**

**संबंधित तपशील**

| | | |
|---|---|---|
| १ | वैयक्तिक जामीनदार (पीजी) चे नाव | **कु. सरिता बूरुगू (उर्फ कु. सरिता ग्रांधी)** डीआयएन - ००३३२२०९ |
| २ | कॉर्पोरेट ऋणकोचे नाव, ज्याच्याकरिता वैयक्तिक जामीनदाराद्वारे हमी देण्यात आली आहे | **मैना इंडस्ट्रीज लिमिटेड.** सीआयएनः U17111TZ1993PLC006729 |
| ३ | वैयक्तिक जामीनदाराचा पत्ता | व्हिला क्र. ८५, आदर्श पाम रिट्रीट, देवराबीसंहल्ली आऊटर रिंग रोड, सर्जापूर रोड, वर्थूर पोस्ट, बंगळुरु-५६०१०३. |
| ४ | अर्ज स्वीकारणाऱ्या आदेशाचे तपशील | माननीय एनसीएलटी यांनी कॉर्पोरेट ऋणको (मैना इंडस्ट्रीज लिमिटेड)चे वैयक्तिक जामीनदार कु. सरिता बूरुगू, यांच्याविरुद्ध सीपी(आयबी)/२१६/सीएचई/२०२२ दिनांक ९ जून, २०२६ नुसार दिवाळखोरी ठराव प्रक्रिया स्वीकारली आहे. (आदेश दि. १५ जून, २०२६ रोजी प्राप्त) |
| ५ | आयबीसी,२०१६ अंतर्गत वैयक्तिक जामीनदाराच्या संदर्भात दिवाळखोरी प्रक्रिया सुरू होण्याचा दिनांक | दि. ९ जून, २०२६ (आदेश दि. १५ जून, २०२६ रोजी प्राप्त) |
| ६ | दिवाळखोरी ठराव प्रक्रिया बंद होण्याचा अंदाजित दिनांक | दि. ०६ डिसेंबर, २०२६ (स्वीकारल्याच्या दिनांकापासून सुरु झालेले १८० दिवस) |
| ७ | ठराव व्यावसायिक म्हणून काम पाहणाऱ्या दिवाळखोरी व्यावसायिकाचे नाव आणि नोंदणी क्रमांक | श्री. सुधीर जीएस नोंद. क्र.: IBBI/IPA-001/IP-P-02744/2022-2023/14183 |
| ८ | मंडळाकडे नोंदणी केल्यानुसार ठराव व्यावसायिकाचा पत्ता आणि ई-मेल | ११ सुभम, जयलक्ष्मी स्ट्रीट कीलकातलाई, चेन्नई-६००११७, ईमेल आयडीः sudhircaip@gmail.com |
| ९ | ठराव व्यावसायिकासह पत्रव्यवहाराकरिता वापरावयाचा पत्ता आणि ई-मेल | पत्रव्यवहाराचा पत्ताः ७ वा मजला, केआरडी जीईई जीईई क्रिस्टल, डॉ. राधाक्रिष्णन सलाई, मैलापोर, चेन्नई ६००००४. ईमेल आयडीः sudhircaip@gmail.com |
| १० | दावे सादर करण्याचा अंतिम दिनांक | दि. ०९ जुलै, २०२६ |
| ११ | संबंधित अर्ज येथे उपलब्धः | "फॉर्म बी" https://www.ibbi.gov.in/en/home/downloads |

याद्वारे सूचना देण्यात येते की, राष्ट्रीय कंपनी कायदा न्यायाधिकरण, चेन्नई खंडपीठ यांनी दि. ०९ जून, २०२६ रोजी कु. सरिता बूरुगू उर्फ कु. सरिता ग्रांधी, मैना इंडस्ट्रीज लिमिटेडच्या वैयक्तिक जामीनदार यांची दिवाळखोरी ठराव प्रक्रिया सुरू करण्याचे आदेश दिले आहेत. (आदेश दि. १५ जून, २०२६ रोजी प्राप्त)

कु. सरिता बूरुगू यांच्या धनकोंना, याद्वारे त्यांचे दावे पुराव्यासह दि. ०९ जुलै, २०२६ रोजी किंवा त्यापूर्वी भारतीय नादारी आणि दिवाळखोरी मंडळ (वैयक्तिक जामीनदारांकरिता कॉर्पोरेट ऋणकोकरिता दिवाळखोरी ठराव प्रक्रिया) विनियमन २०१९ च्या विनियमन ७(१) अन्वये, विहीत अर्ज **"फॉर्म बी"** मध्ये ठराव व्यावसायिकांना वरील **नोंद क्र. ९** मध्ये उल्लेखिलेल्या पत्त्यावर सादर करण्याची मागणी करण्यात येत आहे. धनकोंनी त्यांचे दावे पुरावे, दाव्यांचे तपशील आणि वैयक्तिक माहितीसह इलेक्ट्रॉनिक माध्यमांद्वारे किंवा कुरियर, स्पीड पोस्ट किंवा रजिस्टर्ड पत्राद्वारे सादर करावे. दाव्याबाबतचे चुकीचे किंवा दिशाभूल करणारे दावे सादर केल्यास दंड ठोठावण्यात येईल.

**श्री. सुधीर जीएस**
आयबीबीआय नोंदणी क्र.: IBBI/IPA-001/IP-P-02744/2022-2023/14183
कु. सरिता बूरुगू (मैना इंडस्ट्रीज लिमिटेडच्या पीजी) करिता आरपी
एएफए वैधता दि. ३१.१२.२०२६ पर्यंत

दिनांकः १९.०६.२०२६
ठिकाणः चेन्नई



## NOTICE

**NOTICE** is hereby given to the public at large that the undersigned is investigating the title of Flat No. 1 Jitendra Sharma, Sachindra Sharma, Narendra Sharma, Flat No. 2 Thakur Khubchand Thakur, Flat No. 3 Pushpa Hariram Raheja, Meena H. Raheja, Sunil H. Raheja, Flat No. 4 Prahladrai R. Sharma, Poonam Jitendra Sharma, Kalpana Sachindra Sharma, Yogita Narendra Sharma, Flat No. 5 Kanayalal Narumal Jeswani HUF, Nanik R. Jeswani, Flat No. 6 Kalavati R. Jeswani, Shashi Reluram Jeswani, Flat No. 7 Dr. Sunder Hariram Vasandani, Lata Sunder Vasandani, Flat No. 8 Madhu Phatumal Golani, Flat No. 9 Hariram Sobasingh Nagpal, Shantibai Hariram Nagpal, Nandlal H. Nagpal, Gul H. Nagpal, Flat No. 10 Joginderlal D. Chawla, Garage No. 1 Narendra P. Sharma, Garage No. 2 Prahladrai Sharma, Sachindra Sharma. Updesh Co-Operative Housing Society a Society Registered Under Co-Operative Societies Act, 1956, in respect of property which is more particularly described in the Schedule hereunder written ("Property"), since my Client has agreed to acquire the said Flats along with Land & Building Subject to verification of title.

All person (s) including financial institution (s), society (ies), firm (s), statutory authorities, institution (claiming or otherwise) claiming or having any share, right, title, estate, interest, claim or demand whatsoever to or in respect to the Property or any part thereof, whether by way of sale, ownership, transfer, assignment, exchange, charge, encumbrance, tenancy, sub-tenancy, lease, sub-lease, license, mortgage, inheritance, gift, lien, maintenance, bequest, succession, family arrangement, casement grant, trust, covenant, possession, development rights, agreement, settlement, assignment, order / decree/ judgment of court, attachment, memorandum of understanding, notice, or otherwise of any nature whatsoever, are hereby required to make the same known in writing to the undersigned at the within mentioned address along with an email at the within mentioned email address, within 14 days from the date of publication hereof, with true copies of the documentary evidence on which they are basing and asserting their rights with respect to the Property or any part thereof, failing which, such claim, demand, right, title, interest, dispute, demand of objection, if any, shall be deemed to have been waived and / or abandoned to all intents and purposes, and the transfer of the said property to my Client shall be completed without any reference thereto.

**SCHEDULE**

All that piece and parcel of Plot No. 729 of TPS III Bandra, bearing CTS No. E/701 of Village Bandra, Taluka Andheri, in the Registration District of Mumbai Suburban District situated at Corner of 11th Road & Khar Pali Road now known as P. D. Hinduja Marg, Khar (W) Mumbai – 400 052 TOGETHER WITH building standing thereon known as "UPDESH" comprising of Ground + 3 Upper Floors, having 10 residential flats & 02 Garages. by admeasurement 685.52 sq. mtrs, together with the building admeasuring 685.52 sq. mtrs, standing thereon.

**On or towards North : P. D. Hinduja Hospital**
**On or towards South : Khar Pali road**
**On or towards East : Bhasin House**
**On or towards West : 11th road**

Sd/-
**CSA & ASSOCIATES**
**Advocate & Company Secretary**
**D-1 Kumud Nagar, Near PVR Cinema, S.V. Road Goregaon (West) Mumbai – 400 104**
**Email: - advcsagarwal@gmail.com**

**Place: Mumbai.**
**Dated: 19/06/2026**



## जाहीर सूचना

(नादारी आणि दिवाळखोरी संकेत, २०१६ च्या कलम १०२ अन्वये)
**मैना इंडस्ट्रीज लिमिटेडचे वैयक्तिक जामीनदार**
**श्री. प्रशांत बूरुगू यांच्या धनकोंचे लक्ष वेधण्याकरिता**

**संबंधित तपशील**

| | | |
|---|---|---|
| १ | वैयक्तिक जामीनदार (पीजी) चे नाव | **श्री. प्रशांत बूरुगू** डीआयएन - ००३८१२२५ |
| २ | कॉर्पोरेट ऋणकोचे नाव, ज्याच्याकरिता वैयक्तिक जामीनदाराद्वारे हमी देण्यात आली आहे | **मैना इंडस्ट्रीज लिमिटेड.** सीआयएनः U17111TZ1993PLC006729 |
| ३ | वैयक्तिक जामीनदाराचा पत्ता | व्हिला क्र. ८५, आदर्श पाम रिट्रीट, देवराबीसंहल्ली आऊटर रिंग रोड, सर्जापूर रोड, वर्थूर पोस्ट, बंगळुरु-५६०१०३. |
| ४ | अर्ज स्वीकारणाऱ्या आदेशाचे तपशील | माननीय एनसीएलटी यांनी कॉर्पोरेट ऋणको (मैना इंडस्ट्रीज लिमिटेड)चे वैयक्तिक जामीनदार श्री. प्रशांत बूरुगू, यांच्याविरुद्ध सीपी(आयबी)/२१७/सीएचई/२०२२ दिनांक ९ जून, २०२६ नुसार दिवाळखोरी ठराव प्रक्रिया स्वीकारली आहे. (आदेश दि. १५ जून, २०२६ रोजी प्राप्त) |
| ५ | आयबीसी,२०१६ अंतर्गत वैयक्तिक जामीनदाराच्या संदर्भात दिवाळखोरी प्रक्रिया सुरू होण्याचा दिनांक | दि. ९ जून, २०२६ (आदेश दि. १५ जून, २०२६ रोजी प्राप्त) |
| ६ | दिवाळखोरी ठराव प्रक्रिया बंद होण्याचा अंदाजित दिनांक | दि. ०६ डिसेंबर, २०२६ (स्वीकारल्याच्या दिनांकापासून सुरु झालेले १८० दिवस) |
| ७ | ठराव व्यावसायिक म्हणून काम पाहणाऱ्या दिवाळखोरी व्यावसायिकाचे नाव आणि नोंदणी क्रमांक | श्री. सुधीर जीएस नोंद. क्र.: IBBI/IPA-001/IP-P-02744/2022-2023/14183 |
| ८ | मंडळाकडे नोंदणी केल्यानुसार ठराव व्यावसायिकाचा पत्ता आणि ई-मेल | ११ सुभम, जयलक्ष्मी स्ट्रीट कीलकातलाई, चेन्नई-६००११७, ईमेल आयडीः sudhircaip@gmail.com |
| ९ | ठराव व्यावसायिकासह पत्रव्यवहाराकरिता वापरावयाचा पत्ता आणि ई-मेल | पत्रव्यवहाराचा पत्ताः ७ वा मजला, केआरडी जीईई जीईई क्रिस्टल, डॉ. राधाक्रिष्णन सलाई, मैलापोर, चेन्नई ६००००४. ईमेल आयडीः sudhircaip@gmail.com |
| १० | दावे सादर करण्याचा अंतिम दिनांक | दि. ०९ जुलै, २०२६ |
| ११ | संबंधित अर्ज येथे उपलब्धः | "फॉर्म बी" https://www.ibbi.gov.in/en/home/downloads |

याद्वारे सूचना देण्यात येते की, राष्ट्रीय कंपनी कायदा न्यायाधिकरण, चेन्नई खंडपीठ यांनी दि. ०९ जून, २०२६ रोजी श्री. प्रशांत बूरुगू, मैना इंडस्ट्रीज लिमिटेडचे वैयक्तिक जामीनदार यांची दिवाळखोरी ठराव प्रक्रिया सुरू करण्याचे आदेश दिले आहेत. (आदेश दि. १५ जून, २०२६ रोजी प्राप्त)

श्री. प्रशांत बूरुगू यांच्या धनकोंना, याद्वारे त्यांचे दावे पुराव्यासह दि. ०९ जुलै, २०२६ रोजी किंवा त्यापूर्वी भारतीय नादारी आणि दिवाळखोरी मंडळ (वैयक्तिक जामीनदारांकरिता कॉर्पोरेट ऋणकोकरिता दिवाळखोरी ठराव प्रक्रिया) विनियमन २०१९ च्या विनियमन ७(१) अन्वये, विहीत अर्ज **"फॉर्म बी"** मध्ये ठराव व्यावसायिकांना वरील **नोंद क्र. ९** मध्ये उल्लेखिलेल्या पत्त्यावर सादर करण्याची मागणी करण्यात येत आहे. धनकोंनी त्यांचे दावे पुरावे, दाव्यांचे तपशील आणि वैयक्तिक माहितीसह इलेक्ट्रॉनिक माध्यमांद्वारे किंवा कुरियर, स्पीड पोस्ट किंवा रजिस्टर्ड पत्राद्वारे सादर करावे. दाव्याबाबतचे चुकीचे किंवा दिशाभूल करणारे दावे सादर केल्यास दंड ठोठावण्यात येईल.

**श्री. सुधीर जीएस**
आयबीबीआय नोंदणी क्र.: IBBI/IPA-001/IP-P-02744/2022-2023/14183
श्री. प्रशांत बूरुगू (मैना इंडस्ट्रीज लिमिटेडच्या पीजी) करिता आरपी
एएफए वैधता दि. ३१.१२.२०२६ पर्यंत

दिनांकः १९.०६.२०२६
ठिकाणः चेन्नई



## जाहीर सूचना

याद्वारे जनतेला सूचना देण्यात येत आहे की, **गोशर अलायन्स एलएलपी (एलएलपीआयएनः एएसी-१३८५)**, मर्यादित दायित्व भागीदारी अधिनियम, २००८ च्या तरतुदींनुसार नोंदणीकृत असलेली एक मर्यादित दायित्व भागीदारी संस्था असून, तिचे नोंदणीकृत कार्यालय बी-७०१, वन बीकेसी, प्लॉट नं. सी-६६, जी-ब्लॉक, बांद्रा कुर्ला कॉम्प्लेक्स, वांद्रे पूर्व, मुंबई ४०० ०५१ येथे, ही दादर-माटुंगा इस्टेटमधील प्लॉट क्र. २७६, सी. एस. क्र. २१५/१०, माटुंगा विभाग, वॉर्ड क्र. एफएन-७४८५(१) येथील ८७६.२५ चौरस मीटर क्षेत्रफळाच्या महानगरपालिका भाडेपट्ट्याच्या प्लॉटची, तसेच त्यावर देवधर रोड, माटुंगा (पूर्व), मुंबई ४०००१९ येथे स्थित **गणेश भुवन** नावाने ज्ञात उपकर आकारलेल्या इमारतीची विकासक आहे. सदर इमारतीमध्ये तळमजला आणि वरचे ३ मजले असून, सध्या ती खालील तपशिलानुसार भाडेकरू/रहिवाशांच्या ताब्यात आहे:

| अ.क्र. | भाडेकरूचे नाव | रहिवाशांचे नाव | मजला | फ्लॅट क्र. | वापरकर्ता (आर/एनआर) |
|---|---|---|---|---|---|
| १. | राधिका संजीव शहा आणि जतीन वासुदेव परांजपे | राधिका संजीव शहा आणि जतीन वासुदेव परांजपे | तळ | १ | आर |
| २. | प्रीती उमेश चंदन आणि मिहिर उमेश चंदन | प्रीती उमेश चंदन आणि मिहिर उमेश चंदन | तळ | २ | आर |
| ३. | उमेश त्रिकमदास चंदन आणि हर्ष उमेश चंदन | उमेश त्रिकमदास चंदन आणि हर्ष उमेश चंदन | तळ | ३ | आर |
| ४. | विनय वामन परांजपे | विनय वामन परांजपे | तळ | ४ | आर |
| ५. | शुभदा जगसिया | शुभदा जगसिया | १ला | ५ | आर |
| ६. | मुकेश रावजी गाला आणि भावेश रावजी गाला | मुकेश रावजी गाला आणि भावेश रावजी गाला | १ला | ६ | आर |
| ७. | समीर कनैयालाल ठक्कर आणि सीमा समीर ठक्कर | समीर कनैयालाल ठक्कर आणि सीमा समीर ठक्कर | १ला | ७ | आर |
| ८. | संजय अहिर | संजय नारायणभाई अहिर आणि अशोक नारायणभाई अहिर | १ला | ८ | आर |
| ९. | जतीन वासुदेव परांजपे | जतीन वासुदेव परांजपे | २रा गॅरेजसह | ९ | आर |
| १०. | स्वर जयेश चंदन | स्वर जयेश चंदन | २रा | १० | आर |
| ११. | सुनील जवाहर वोरा आणि चंद्रिका सुनील वोरा | सुनील जवाहर वोरा आणि चंद्रिका सुनील वोरा | ३रा | ११ | आर |

उपरोक्त फ्लॅट्स/गॅरेज किंवा त्याच्या कोणत्याही भागाच्या संदर्भात, विक्री, सामंजस्य करार, करारनामा, देवाणघेवाण, गहाण, शुल्क, बक्षिस, न्यास, वारसा, उत्तराधिकार, ताबा, भाडेपट्टा, वहिवाट, देखभाल, सुखाधिकार, परवाना, वसीयत, हिस्सा, अभिहस्तांकन, धारणाधिकार, जप्ती, प्रलंबित खटला किंवा इतर कोणत्याही स्वरूपाचे कोणतेही आक्षेप, दावा, हक्क, शिर्षक आणि/किंवा हितसंबंध असलेल्या कोणत्याही व्यक्तीला किंवा संस्थेला, ज्यामध्ये कोणताही कर्जदाता/बँक/वित्तीय संस्था/वित्तीय कंपनी समाविष्ट आहे, याद्वारे सूचित करणे आवश्यक आहे की, त्यांनी या सूचनेच्या प्रकाशनाच्या तारखेपासून १४ (चौदा) दिवसांच्या कालावधीत, सहाय्यक कागदपत्रांसह लेखी स्वरूपात अधोस्वाक्षरी करणाऱ्यास कळवावे; असे करण्यात अयशस्वी झाल्यास, असे सर्व दावे सोडून दिलेले आणि/किंवा त्यागलेले मानले जातील.

ठिकाण: मुंबई
दिनांक: १८ जून २०२६.

**गोशर अलायन्स एलएलपी**
७०१/बी, वन बीकेसी, प्लॉट नं. सी-६६, जी ब्लॉक,
वांद्रे कुर्ला कॉम्प्लेक्स, वांद्रे पूर्व, मुंबई ४०००५१



## सूचना

याद्वारे जनतेला **सूचना** देण्यात येत आहे की आमच्या अशिलांच्या वतीने, आम्ही याखाली दिलेल्या **अनुसूची**मध्ये अधिक विशेषतः वर्णन केलेल्या जमिनीबाबत (**"जमीन"**) (i) **राजीव बनवारीलाल गुप्ता**, (ii) **क्रीशन हरबंसलाल गुप्ता**, (iii) **पुनीत प्यारेलाल गुप्ता आणि** (iv) **मुनीश प्यारेलाल गुप्ता** (**"मालक"**) यांच्या मालकी अधिकाराची, मालकी हक्काची आणि हितसंबंधाची चौकशी करीत आहोत.

जमीन आणि/किंवा तीच्या कोणत्याही भागामधील मालकांचे अधिकार, मालकी हक्क, हितसंबंधा विरोधात/वर/संदर्भात सर्व व्यक्तींचे/एन्टीटीचे/कर्जदात्याचे विक्री, हिस्सा, सामंजस्य करार, वितरण, करार, टर्मशिट, अभिहस्तांक, संपादन, उत्तराधिकार, मार्गाचा अधिकार, वहीवाट, कौटुंबिक व्यवस्था/तडजोड, जप्ती, आरक्षण, थकबाकी, विकसन अधिकार, वस्तू-विनिमय करार, विकास क्षमता वापरण्याचा अधिकार, चटई क्षेत्र निर्देशाचा वापर, हस्तांतरणीय विकास हक्क, विभाजन, हस्तांतरण, विनिमय, नियुक्ती, गहाणवट, प्राप्य करण्यायोग्य गोष्टींचे गृहीतक, तारण, धारणाधिकार, हमी, भार, भेट, विश्वस्त, वक्फ, देखभाल, वारसा, दावा, ताबा, भाडयाने देणे, भाडेपट्टा, उप-भाडेपट्टा, कुळ, उपकुळ, प्रलंबित दावे, परवाना, सुविधाधिकार, काळजीवाहू हक्क, इच्छापत्राने दीलेली, मृत्युपत्र, कोणत्याही न्यासाअंतर्गत कोणताही ऋणभार, करार किंवा फायदेशीर हक्क/हित, प्रिस्क्रीप्शन किंवा प्रीएम्शनचा अधिकार किंवा कोणताही करार /लेखन / दस्तऐवज किंवा इतर प्रवृत्ती किंवा कोणत्याही खटल्याअंतर्गत कोणत्याही न्यायालयाने किंवा प्राधिकरणाने पारित केलेला डिक्री, आदेश किंवा निवाडा किंवा अन्यथा कायद्याच्या कार्याचा समावेश करुन कोणत्याही प्रकारे कोणताही दावा आणि/किंवा मागणी आणि/किंवा आक्षेप आणि/किंवा हिस्सा आणि/किंवा लाभ (एकत्रितपणे **"दावे"**) असल्यास त्यांनी याद्वारे अधोस्वाक्षरीदारांना खैतान ॲण्ड कंपनी, वकिल, वन वर्ल्ड सेन्टर, १३वा मजला, टॉवर-१सी, सेनापति बापट मार्ग, मुंबई ४०००१३ येथे तसेच mumbai@khaitanco.com (श्री. अमित एच. वाधवानी यांना लक्षवेधासाठी चिन्हांकित करुन) या ईमेल सहाय्यक कागदपत्रांच्या प्रमाणित प्रतींसह, सदर प्रकाशनाच्या तारखेपासून **१४ (चौदा) दिवसांच्या** कालवधीत लेखी कळवणे आवश्यक आहे, अन्यथा असे दावे दावेदारांनी त्याग केले आहेत आणि/किंवा असे दावे वापरण्याचा अधिकार सोडून दिले आहेत आणि जर असे दावे असतील तर ते आमच्या अशिलांवर आणि/किंवा मालकांवर आणि/किंवा विकासकावर बंधनकारक नाही असे मानले जाईल.

**वर संदर्भित अनुसूची**
(जमिनीचे वर्णन)

मुंबई उपनगरातील मुलंड येथील नगर भूमापन अधिकायाच्या अधिकारक्षेत्रातील कांजूर गावामधील सीटीएस क्र. २४३ शी संबंधित सर्व्हे क्र. १०६/१ (आत्ताचा सर्व्हे क्र. १०६/१/१) असलेला मोजमापीत ६,८९३.६० चौरस मिटर्स जमिनीचा सर्व तो तुकडा आणि खंड. जमिनीच्या चर्तु:सीमा खालिलप्रमाणे आहेत:

पूर्वेकडे वा त्या दिशेला : सीटीएस क्र. २४५, २३९, २४०, २४१;
पश्चिमेकडे वा त्या दिशेला : सीटीएस क्र. २१४ आणि २२०;
उत्तरेकडे वा त्या दिशेला : सीटीएस क्र. २२६; आणि
दक्षिणेकडे वा त्या दिशेला : समर्थ नगर रोड.

**आज दिनांक १९ जुन २०२६**

**खैतान ॲन्ड कंपनी** करीता
**सही/-**
**अमित एच. वाधवानी**
**भागीदार**

# कोची वॉटर मेट्रोत गरबा! उद्योगपती गोएंकांची पोस्ट



**कोची -** केरळमधील कोची वॉटर मेट्रोमध्ये पर्यटकांच्या एका गटाने गरबा नाचल्याचा व्हिडिओ सोशल मीडियावर प्रचंड व्हायरल झाला. या व्हिडिओवर प्रसिद्ध उद्योगपती हर्ष गोएंका यांनी तीव्र चिंता व्यक्त करून हे आता खरोखरच हाताबाहेर जात आहे, अशी प्रतिक्रिया दिली आहे. एका व्हिडिओत काही पर्यटक वॉटर मेट्रोत गाण्याच्या तालावर वर्तुळ करून गरबा खेळताना दिसत आहेत. आरपीजी एंटरप्रायझेसचे अध्यक्ष हर्ष गोएंका यांनी एक्सवर हा व्हिडिओ शेअर करत सार्वजनिक ठिकाणी नागरिकांच्या 'सिव्हिक सेन्स'वर प्रश्नचिन्ह उपस्थित केले. सार्वजनिक वाहतूक व्यवस्था ही प्रवासासाठी आहे, हा मनोरंजनाचा मंच नाही, असा सूर हर्ष गोएंका यांनी आळवला. या व्हिडिओमुळे नेटकऱ्यांमध्ये दोन गट पडले आहेत. काही लोकांनी पोस्ट करून म्हटले की, सार्वजनिक ठिकाणी डान्स केल्याने इतर सहप्रवाशांना त्रास होतो आणि सुरक्षिततेला धोका निर्माण होऊ शकतो. तर काही लोकांनी म्हटले की, हा एक निरवळ आनंद साजरा करण्याचा क्षण आहे.

# उबाठा पुन्हा फुटली! यावेळी मात्र माफी नाही! पक्षाचा आदेश




पान १ वरून

सज्जड इशारा दिला. यावेळी गद्दारांना मुळीच माफ करणार नाही. जिथे दिसेल तिथे बंडखोरांना तुडवा, हेच आता आम्ही करणार आहोत. आमच्या या भूमिकेला शरद पवार यांनीही पाठिंबा दिला असून ते स्वतः बंडखोरांच्या मतदारसंघांमध्ये जाऊन सभा घेणार आहेत, असे राऊत यांनी सांगितले. संजय राऊत यांच्या वक्तव्याला फक्त बीड जिल्ह्यात त्वरित प्रतिसाद मिळाला. उबाठा कार्यकर्त्यांनी सहाही खासदारांचे प्रतीकात्मक पुतळे जाळले. मात्र इतरत्र शांतता होती.

बैठकीला हजर न राहिलेल्या सहा फुटीर खासदारांना कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आली असून, सात दिवसांत नोटिशीला उत्तर देण्यास सांगण्यात आले आहे, असे अरविंद देसाई यांनी सांगितले. नोटीसला उत्तर दिले नाही तर कारवाई करण्याचा प्रस्ताव लोकसभा अध्यक्षांकडे पाठवण्यात येईल. हे सर्व घडत असताना एकनाथ शिंदे हे भिवंडीत होते. नाशिकच्या विधान परिषद निवडणुकीत दगाफटका होऊ नये यासाठी ते नगरसेवकांशी बोलण्यात व्यग्र होते.

फुटीर खासदारांबद्दल बोलताना आज राऊत यांचा पारा चढलेलाच होता. त्यांनी फुटीरांचा उल्लेख गांडू असा केला. बाळासाहेब ठाकरेंचे जन्मशताब्दी वर्ष सुरू असतानाच या गांडू लोकांनी विश्वासघात केला, म्हणून माझ्या मनात प्रचंड संताप आहे. त्यांच्या या कृत्याबद्दल शिवसैनिकच नव्हे तर महाराष्ट्राची जनता माफ करणार नाही. त्यांच्या मतदारसंघांत जाऊन त्यांना धडा शिकऊ, असे राऊत म्हणाले. या संपूर्ण तमाशाला सर्वोच्च न्यायालयच जबाबदार आहे, असा थेट आरोपही राऊत यांनी केला. यावर मंत्री गिरीष महाजन यांनी तुम्ही काय राडा घालणार म्हणत हेटाळणी केली. त्यावर राऊत अधिकच संतापले. ते म्हणाले की माझ्याकडे ईडी, सीबीआय एक दिवस येऊदे, मी महाजनलाच फोडून दाखवतो. कुंभमेळ्यात कसा भ्रष्टाचार सुरू आहे त्याची माहिती माझ्याकडे आहे.

फुटीर खासदारांना उद्देशून संजय राऊत म्हणाले की, तुमच्यात हिंमत असेल तर खासदारकीचा राजीनामा द्या आणि खुशाल पक्ष सोडून निघून जा. पुन्हा निवडणुकीला सामोरे जा आणि स्वतःच्या बळावर विजय मिळवून दाखवा. मग आम्ही तुम्हाला गद्दार म्हणणार नाही. उलट आम्ही अभिमानाने सांगू की, सध्याच्या राजकारणातले हे आधुनिक संत आहेत. त्यांचे ऑपरेशन काय होते टायगर? लपणारे कधी टायगर नसतात. आम्ही खरे टायगर आहोत. त्यामुळे आम्ही म्हणतो आहोत आम्ही ऑपरेशन तुडवा सुरू करणार. 'तुडवा' हा वंदनीय बाळासाहेब ठाकरेंचा आम्हाला आदेश होता. गद्दारांना आणि त्यांच्या पाठीशी उभे राहणाऱ्यांना कसे तुडवायचे हे शिवसैनिकांना चांगले ठाऊक आहे. तुम्हाला तोडले नाही तर शिवसेना बापाचे नाव सांगणार नाही. आमच्या बापाचे नाव बाळासाहेब ठाकरे आहे. तुम्ही लोकशाहीचा खेळ लावला का? याला फोडू त्याला फोडू, पैशांची मस्ती आलीय का? ईडी सीबीआयची धमकी कोणाला देता आहात, आम्ही जेलमध्ये जाऊन आलो आहोत, पुन्हा जेलमध्ये जाण्यास तयार आहे. तुम्हाला धडा शिकवून तुरुंगात जाऊ.




**महाराष्ट्र काँग्रेसची एक्स पोस्ट -** आमदार, खासदार, पक्ष फोडणारा गिधाड!

दिल्लीत कालपासून राजकीय नाट्य सुरू झाले. असे सांगण्यात येत आहे की फुटीर खासदारांनी आठ दिवसांपूर्वीच लोकसभेचे अध्यक्ष ओम बिर्ला यांना पत्र देऊन आपण स्वतंत्र गट स्थापन करत असल्याचे कळवले आहे. त्यांचा स्वतंत्र गट स्थापन करण्याची प्रक्रिया कधीच पूर्ण झाली आहे. उबाठाचे नेतृत्व बाळासाहेब ठाकरे यांच्या मूळ विचारांपासून भरकटले आहे. त्यांनी बाळासाहेबांच्या विचारांचा त्याग केला आहे. लवकरच उबाठा काँग्रेसमध्ये विलीन करण्याच्या हालचाली सुरू आहे. हे आपल्याला मान्य नसल्याने आपण उबाठापासून वेगळे होण्याचा निर्णय घेतला आहे, असे खासदार म्हणत असल्याचे सांगण्यात आले. दरम्यान आजच शरद पवार गटाचे आमदार उत्तम जानकर म्हणाले की, शरद पवार गटाचे आमदार फुटून अजित पवार गटात जातील. त्यांच्या या वक्तव्याने आणखी खळबळ माजली.

### उबाठाच्या ईशान्य मुंबईतील पदाधिकाऱ्यांची आज बैठक

सहा खासदारांनी साथ सोडत शिंदेंच्या शिवसेनेत प्रवेश करण्याच्या हालचाली सुरू केल्यानंतर आता उबाठाकडून डॅमेज कंट्रोल करण्याचा प्रयत्न सुरू करण्यात आला आहे. उबाठा प्रमुख उद्धव ठाकरे यांनी उद्या ईशान्य मुंबईतील पदाधिकाऱ्यांची महत्त्वाची बैठक बोलावली आहे. ईशान्य मुंबईचे खासदार संजय दिना पाटील यांनी बंडखोरी केल्यानंतर उद्धव ठाकरे हे स्थानिक पदाधिकाऱ्यांशी संवाद साधणार आहेत. उद्धव ठाकरे यांनी मातोश्री निवासस्थानी शुक्रवारी दुपारी १२ वाजता ही बैठक बोलावली आहे. या बैठकीत संजय दिना पाटील यांच्या बंडखोरीनंतर ईशान्य मुंबईतील पदाधिकाऱ्यांची भूमिका काय याची विचारणा करण्यात येणार असल्याची माहिती आहे.

## मोठे मोठे गार केले गंमतमध्ये उदय सामंतांचे स्टेटस चर्चेत

मुंबई - उबाठाच्या सहा खासदारांनी बंडखोरी केल्यानंतर महाराष्ट्राच्या राजकारणात खळबळ उडाली असतानाच शिंदे गटाचे नेते आणि राज्याचे उद्योगमंत्री उदय सामंत यांनी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या फोटोचे व्हॉट्सअॅप स्टेटस ठेवले आहे. या फोटोत 'मोठे मोठे गार केले गंमतमध्ये' असा मजकूर आहे. या स्टेटसचा संबंध उबाठातील खासदारांच्या फुटीशी जोडला जात असल्याने ते चर्चेचा विषय ठरले आहेत. गेल्या काही दिवसांपासून राज्याच्या राजकारणात 'ऑपरेशन टायगर'ची जोरदार चर्चा सुरु होती. ठाकरे गटातील काही खासदार शिंदे गटाच्या संपर्कात असल्याची चर्चा होती. आज हे सहा खासदार उबाठाच्या दिल्लीतील बैठकीला उपस्थित न झाल्याने त्याच्यावर शिक्कामोर्तब झाले. त्यानंतर शिंदे गटाकडून या घडामोडींना मोठे यश मानले जात आहे.







## कायदेतज्ज्ञांचा खासदारांना सल्ला गट स्थापन करून विलीन करावे

पान १ वरून

आहे. अॅड. उज्ज्वल निकम म्हणाले की, या खासदारांनी पक्ष सोडलेला नाही, त्यांनी स्वतंत्र गट स्थापन केला आहे. या स्वतंत्र गटाने स्वत:चा प्रतोद नेमून व्हिप बजावला असेल, मग उबाठाचा व्हिप ग्राह्य धरायचा की नवीन गटाचा व्हिप ग्राह्य धरायचा हे अध्यक्षांनी ठरवायचे आहे. या खासदारांना स्वतंत्र गट करून दुसऱ्या पक्षात विलीन व्हावे लागेल. कायदेतज्ज्ञ उल्हास बापट म्हणाले की, संसदेत मतदान असते तेव्हा व्हिप लागू होते. आजच्या अशा बैठकीला व्हिप लागू होत नाही. पण पक्षाच्या बैठकीला बोलावले आणि उपस्थित राहिले नाही तर अपात्र करा, असे पत्र उबाठा देऊ शकते. इथे गट बाहेर पडला तर मान्यता द्यायची की नाही हा विषय आहे, हा विषय कोर्टात आहे. त्यावर गेली चार वर्षे निर्णय आलेला नाही.

# टेलिग्राम नवे डार्क वेब बनत आहे केंद्र सरकारचा हायकोर्टात दावा

■ नवी दिल्ली

**इन्स्टंट** मेसेजिंग प्लॅटफॉर्म टेलिग्राम हे गुन्हेगारांना जोडणारे आणि त्यांच्या बेकायदेशीर कारवायांना चालना देणारे नवे डार्क वेब बनत असल्याचा दावा केंद्र सरकारने दिल्ली उच्च न्यायालयात केला आहे. नीट परीक्षेच्या पुनर्परीक्षेपूर्वी टेलिग्रामवरील बंदीविरोधात कंपनीने दाखल केलेल्या याचिकेला उत्तर देताना केंद्राने हा दावा केला आहे. सरकारने टेलिग्रामवरील बंदी २२ जूनपर्यंत लागू ठेवण्याचा निर्णय योग्य असल्याचे न्यायालयात सांगितले. तर दुसरीकडे मुकेश अंबानींच्या रिलायन्सचे मेटाशी संबंध असल्याने व्हॉट्सअॅपवर साकारणे बंदी आणली नसल्याचा आरोप टेलिग्रामने केला आहे.

टेलिग्रामचे संस्थापक आणि मालक पावेल डुरोव्ह हे असून ते रशियन आहेत. टेलिग्रामची डिजिटल मेसेजिंग क्षेत्रात प्रामुख्याने रिलायन्सशी स्पर्धा आहे. व्हॉट्सअॅपची मूळ कंपनी मेटा ही रिलायन्स जिओची एक अल्प भागधारक असल्यामुळे, टेलिग्रामची थेट रिलायन्सच्या व्यावसायिक इकोसिस्टम स्पर्धा आहे. टेलिग्रामचे मुख्य कार्यकारी अधिकारी पावेल डुरोव्ह यांनी असा दावा केला की, रिलायन्स कंपनी भारताबाहेरील देशांमध्ये टेलिग्रामची इंटरनेट कनेक्टिव्हिटी जाणूनबुजून विस्कळीत करत आहे.




केंद्र सरकारने दिल्ली हायकोर्टात दाखल केलेल्या प्रतिज्ञापत्रात म्हटले आहे की, टेलिग्राम हे नव्या डार्क वेबसारखे बनले आहे. गुन्हेगार टेलिग्राम चॅनेलद्वारे डार्क वेब फोरमशी जोडणाऱ्या लिंक शेअर करतात. त्यामुळे तपास यंत्रणांना त्यांचा माग काढणे आणि ओळख पटवणे कठीण होते. नीट -यूजी २०२६ प्रश्नपत्रिका पान २ वर

# सुनेत्रा पवारांचा पुन्हा एकदा दिल्ली दौरा

**नवी दिल्ली -** राज्याच्या राजकारणात ऑपरेशन टायगरच्या घडामोडी सुरू असताना उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार आज अचानक दिल्ली दौऱ्यावर रवाना झाल्या. या दिल्लीवारीमागील नेमके कारण स्पष्ट झाले नाही. या दौऱ्यात आज दुपारी त्यांनी केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांची भेट घेतली.

अजित पवार यांच्या निधनानंतर त्यांच्याकडे असलेले अर्थखाते मुख्यमंत्री फडणवीस यांनी आपल्याकडे घेतले आहे. हे खाते पुन्हा आपला पक्षाला मिळावे, अशी मागणी राष्ट्रवादीकडून गेले काही दिवस सुरू आहे. सुनेत्रा पवार आणि अमित शहा यांच्या भेटीत या मागणीवर चर्चा झाल्याचे समजते. याशिवाय इतरही अनेक मुद्यावर या भेटीत चर्चा झाल्याची माहिती आहे. याशिवाय या भेटीत आणखी कुठल्या विषयावर चर्चा झाली याचा तपशील मिळू शकला नाही.

# पांढऱ्या पट्ट्यांना विरोध करणाऱ्यांवरच गुन्हे

■ मुंबई

**घाटकोपर,** दादरनंतर गिरगावमध्येही पांढऱ्या रंगाच्या पट्ट्यांवरून वाद निर्माण झाला. या प्रकरणात विरोध करणाऱ्यांवरच गुन्हा दाखल झाल्याचा अजब प्रकार झाला आहे.

काही दिवसांपूर्वी गिरगाव चौपाटी परिसरातील बेने हॉटेलसमोरील पदपथावर पांढरे पट्टे मारल्याचे समजताच काही स्थानिक नागरिक घटनास्थळी दाखल झाले. त्यांनी या प्रकाराला विरोध दर्शवत पांढऱ्या पट्ट्यांवर काळ्या रंगाच्या उभ्या-आडव्या रेषा आणि फुल्या मारून निषेध नोंदवला.



अशा प्रकारांना गिरगावकर सहन करणार नाहीत, असा इशाराही दिला. यावेळी पोलिसांनी विरोध करणाऱ्या काही जणांना ताब्यात घेतले. त्यानंतर दुसऱ्या दिवशी सकाळी पालिका प्रशासन आणि पोलिसांनी संबंधित पांढऱ्या पट्ट्यांवर लाल रंगाचे चिन्ह मारून वाद मिटवण्याचा प्रयत्न केला. दरम्यान, मनसे विभाग अध्यक्ष दिनेश पुंडे यांनी गावदेवी पोलिसांना निवेदन देऊन जैन समाजातील ज्या विघ्न संतोषी लोकांनी सार्वजनिक मालमत्तेवर पांढरे पट्टे मारले त्यांच्यावर गुन्हा दाखल करण्याची मागणी केली होती. मात्र, पोलिसांनी आंदोलकांवरच गुन्हा दाखल केल्याने संताप व्यक्त केला.

# नीट परीक्षेच्या तणावातून आणखी दोन विद्यार्थिनींची आत्महत्या

■ नवी दिल्ली

**वैद्यकीय** शिक्षणासाठीची नीट परीक्षा देणाऱ्या आणखी दोन विद्यार्थ्यांनी आत्महत्या केल्याच्या दुर्दैवी घटना डेहराडून आणि दिल्ली येथे घडल्या आहेत. डेहराडूनमध्ये २३ वर्षीय रिया कुमारी हिचा मंगळवारी सकाळी तिच्या खोलीत गळफास घेतलेल्या अवस्थेत मृतदेह आढळला. कारगिल युद्धातील एका माजी सैनिकाची मुलगी असलेल्या रियाने बारावीच्या परीक्षेत ९६ टक्क्यांहून अधिक गुण मिळवले होते. ती यंदा तिसऱ्यांदा नीट परीक्षेची तयारी करत होती. तिच्या सुसाईड नोटमध्ये तिने खोल खंत व्यक्त करत म्हटले होते की, मी सर्वांवर ओझे ठरले याबद्दल माफी मागते. यासाठी कुणीही जबाबदार नाही, माझी अयोग्यता कारणीभूत आहे. पोलिसांच्या प्राथमिक तपासानुसार, शैक्षणिक प्रगतीबाबतची निराशा हे आत्महत्येचे प्रमुख कारण असावे. कुटुंबियांनी सांगितले की, रियामध्ये यापूर्वी नैराश्याची कोणतीही लक्षणे दिसली नव्हती. ती २१ जून रोजी होणाऱ्या पुनर्परीक्षेची तयारी करत होती. दरम्यान, दक्षिण-पश्चिम दिल्लीतील पालम कॉलनीमध्ये राहणारी १७ वर्षीय रेणू हिचा १३ जून रोजी मृतदेह आढळून आला.

# ममता बॅनर्जींना हायकोर्टाचा धक्का विरोधी पक्षनेतेपदी ऋतब्रता कायम

सविस्तर वाचण्यासाठी व शेअर करण्यासाठी हा क्युआर कोड स्कॅन करा

■ कोलकाता

**पश्चिम** बंगालच्या माजी मुख्यमंत्री आणि तृणमूल काँग्रेसच्या प्रमुख ममता बॅनर्जी यांना कोलकाता उच्च न्यायालयाकडून आणखी एक मोठा धक्का बसला आहे. बंडखोर आमदार ऋतब्रता बॅनर्जी यांची विधानसभेतील विरोधी पक्षनेते म्हणून नियुक्ती करण्याला आव्हान देणाऱ्या याचिकेवर कोणताही अंतरिम दिलासा देण्यास न्यायालयाने स्पष्ट नकार दिला आहे.

न्यायमूर्ती कृष्ण राव यांच्या एकल खंडपीठाने आज यावर सुनावणी करताना म्हटले की, पुढील सुनावणीपर्यंत अध्यक्षांचा निर्णय पूर्णपणे लागू राहील. पश्चिम बंगाल विधानसभा निवडणुकीतील पराभवानंतर तृणमूल काँग्रेसमध्ये मोठे राजकीय संकट निर्माण झाले.



पक्षातून काढून टाकलेले बंडखोर नेते ऋतब्रता बॅनर्जी यांनी तृणमूल नेतृत्वाविरोधात मोहीम सुरू केली होती. आपल्याला ५८ बंडखोर आमदारांचा पाठिंबा असल्याचा दावा ऋतब्रता यांनी केला होता. या बंडखोर गटाने ममता बॅनर्जी यांना आपल्या नेत्या म्हणून स्वीकारले, परंतु त्यांचे भाचे आणि तृणमूलचे राष्ट्रीय सरचिटणीस अभिषेक बॅनर्जी यांचे नेतृत्व स्वीकारण्यास पूर्णपणे नकार दिला.

या राजकीय गोंधळाच्या पार्श्वभूमीवर, पश्चिम बंगाल विधानसभेचे अध्यक्ष रतिंद्र बोस यांनी बंडखोर गटाचा दावा मान्य करत ऋतब्रता भट्टाचार्य यांना विधानसभेतील विरोधी पक्षनेते म्हणून मान्यता दिली. अध्यक्षांच्या या निर्णयामुळे ममता बॅनर्जी यांचे अधिकृत उमेदवार सोवनदेव चॅटर्जी यांचा दावा फेटाळला गेला.

# विधान परिषद निवडणुकीत काँग्रेस नगरसेवकांनी पक्षादेश धुडकावला

■ अमरावती

**राज्य विधान** परिषदेच्या स्थानिक स्वराज्य संस्था मतदारसंघातील १७ पैकी ६ जागांवर उमेदवार बिनविरोध निवडून आल्यानंतर उर्वरित ११ जागांसाठी आज शांततेत मतदान पार पडले. अमरावतीत मात्र काँग्रेसला मोठा राजकीय धक्का बसला. पक्षाने तटस्थ राहण्याचा अधिकृत व्हिप जारी करूनही काँग्रेसच्या ६ नगरसेवकांनी तो धुडकावून लावत मतदान केले. महायुती आणि महाविकास आघाडीचे आता २२ जून रोजी होणाऱ्या मतमोजणीकडे राज्याचे लक्ष लागले आहे.

अमरावती महानगरपालिकेतील काँग्रेसच्या १६ नगरसेवकांपैकी तब्बल ६ नगरसेवकांनी पक्षादेशाकडे दुर्लक्ष करत मतदानाचा हक्क बजावला. यामध्ये धीरज हिवसे, जयश्री जठाले, लुबना तनवीर, अप्सर जहा सादिक शाह, विकी वानखडे आणि प्रशांत महाले यांचा समावेश आहे. काही नगरसेवक चेहऱ्याला कापड गुंडाळून मतदान केंद्रावर पोहोचल्याची चर्चा राजकीय वर्तुळात रंगली आहे. याशिवाय माजी मंत्री आणि काँग्रेसच्या ज्येष्ठ नेत्या यशोमती ठाकूर यांच्या भागातही १४ काँग्रेस नगरसेवकांपैकी ३ जणांनी पक्षादेश झुगारून मतदान केले. यामध्ये सीमा पान २ वर

# युएईमध्येही अल्पवयीन मुलांच्या सोशल मीडिया वापरावर बंदी

**ब्रिटन, ऑस्ट्रेलिया आणि मलेशियापाठोपाठ संयुक्त अरब अमिरातीनेही (यूएई) पंधरा वर्षांखालील मुलांच्या सोशल मीडिया वापरावर बंदी घातली आहे. असा कायदा करणारा यूएई हा पहिला अरब देश ठरला आहे.**

■ अबुधाबी

**युएई** सरकारने आज याबाबतच्या ठरावाला मंजुरी दिली. त्यानुसार आता देशात पंधरा वर्षांखालील मुलांना कोणत्याही सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवर स्वतःचे अकाऊंट उघडता येणार नाही किंवा सोशल मीडियावरील अन्य कुणाचे अकाऊंट वापरता येणार नाही.



सोशल मीडियाच्या अतिवापरामुळे मुलांच्या शारीरिक आणि मानसिक आरोग्यावर प्रतिकूल परिणाम होतो असे जगभरातील संशोधनांमधून दिसून आले आहे. त्यामुळे सध्या जगभरात याबाबत चिंता व्यक्त केली जात आहे. ब्रिटन, ऑस्ट्रेलिया आणि मलेशिया आदि देशांनी आपापल्या देशांत कायदे करून या समस्येवर मात करण्याचा प्रयत्न केला आहे. तर अनेक देश अशाच प्रकारचा कायदा करायचा गांभीर्याने विचार करत आहेत.

# तुपकरांची प्रकृती खालावली मुंबईत शेतकऱ्यांचे आंदोलन

■ मुंबई

**शेतकऱ्यांच्या** सरसकट कर्जमुक्तीसह विविध मागण्यांसाठी बुलडाण्यात सुरू असलेल्या अन्नत्याग आंदोलनाच्या चौथ्या दिवशी शेतकरी नेते रविकांत तुपकर यांची प्रकृती चिंताजनक झाली. तुपकरांच्या प्रकृतीबाबतची माहिती मिळताच राज्यभरातील शेतकरी आणि समर्थक आक्रमक झाले. मुंबईतील गेटवे ऑफ इंडिया येथे संतप्त शेतकऱ्यांनी समुद्रात जलसमाधी आंदोलन केल्याने खळबळ उडाली. पोलिसांनी तत्परता दाखवत आंदोलकांना ताब्यात घेतले असले तरी तुपकरांच्या आंदोलनाचे पडसाद आता राज्यभर उमटत आहेत.

गेल्या चार दिवसांपासून अन्नाचा त्याग केल्यामुळे रविकांत तुपकर यांची प्रकृती बिघडल्याने काल रात्री डॉक्टरांच्या पथकाला बोलावले. वैद्यकीय तपासणीत त्यांच्या शरीरातील साखरेचे प्रमाण घटल्याचे आढळले. त्याचा परिणाम किडनीच्या कार्यक्षमतेवर होत असल्याची माहिती डॉक्टरांनी दिली. वैद्यकीय उपचार घेण्याचा सल्ला दिला तरी, सरकारने मागण्या मान्य केल्याशिवाय आंदोलन मागे घेणार नसल्याची भूमिका तुपकर यांनी कायम ठेवली. तुपकरांच्या प्रकृतीबाबतची माहिती राज्यभर पसरताच विविध भागांतील शेतकरी संघटना आणि कार्यकर्ते रस्त्यावर उतरले.

## मंत्रालयाजवळ झाडावर चढून शेतकऱ्याचे थरारक आंदोलन

लातूर जिल्ह्यातील रवी तुपकर यांच्या समर्थक श्रीराम तुकाराम या शेतकऱ्याने आज मंत्रालय परिसरात आंदोलन केले. मंत्रालयाजवळील महात्मा गांधी यांच्या पुतळ्याशेजारी असलेल्या झाडावर चढून त्याने सरकारविरोधात घोषणाबाजी केली. तो गळ्यात दोर टाकून झाडावर चढला होता. त्यानंतर त्याने फटाके, सुतळी बॉम्ब खाली फेकत निषेध नोंदवला. पोलिसांनी काही तास समजावल्यानंतर तो खाली उतरला. उतरताना त्याने तोंडात सुतळी बॉम्ब ठेवत जबरदस्तीने खाली उतरवण्याचा प्रयत्न झाल्यास स्वत:ला पेटवून घेण्याची धमकी दिली होती. उतरल्यावर त्याने सांगितले की, त्याच्या कुटुंबावर सुमारे ८ लाख रुपयांचे कर्ज आहे. त्याने सरकारकडे राज्यातील सर्व शेतकऱ्यांना सरसकट कर्जमाफी देण्याची मागणी केली.

१४ वा स्मृतिदिन



विठाबाई काशिनाथ व्हावळे
मृत्यू दि.१९-६-२०१२
"आज आमच्यामधून जाऊन चौदा वर्षे झाली, तुझ्या आठवणीशिवाय एकही दिवस जात नाही."
तुझ्या स्मृतीस भावपूर्ण आदरांजली
विनित:-जगन्नाथ काशिनाथ व्हावळे (मुलगा), संजय काशिनाथ व्हावळे (मुलगा), विद्या विजय कांबळे (मुलगी), चेतन विजय कांबळे (नातू), राजू काशिनाथ व्हावळे (मुलगा), मु.गाव ऐनवाडी (बौद्धवाडी)